दैनिक
# लोकविजय
संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक २०६) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शुक्रवार, दि.१४ ऑगस्ट २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## हवाई प्रवाशांच्या सुरक्षेची जबाबदारी घ्या; केंद्र सरकारचे एअर इंडियाला आदेश

मुंबई दि.१३ (प्रतिनिधी)- केंद्र सरकारने फुकेत दिल्ली विमानप्रकरणी एअर इंडियाला हवाई प्रवाशांच्या सुरक्षेची जबाबदारी घेण्यासह आणि विमानांच्या देखरेखीमध्ये सुधारणा करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच नागरी उड्डाण महासंचालनालयाला (डीजीसीए) 'डॉप टेस्ट'च्या नियम अधिक कठोर करण्याचे निर्देश दिले आहेत.

मंगळवार, ४ ऑगस्ट रोजी दिल्लीकडे येणाऱ्या एअर इंडियाच्या विमानात (एआय २३७९) झालेल्या 'टर्ब्युलन्स' आणि विमान अचानक ३०० फूट खाली जाण्याच्या प्रकरणातील 'डॉप टेस्ट'मध्ये (सायकोएक्टिव्ह पदार्थांच्या सेवनाबाबत) मुख्य वैमानिकाने गांजा घेतल्याचे निष्पन्न झाल्याने हवाई सुरक्षेचा प्रश्न पुन्हा अधोरेखित झाला आहे. या घटनेनंतर वैमानिकासह विमान कर्मचाऱ्यांना लागू करण्यात येणाऱ्या नियमांची अंमलबजावणी अधिक कठोरपणे होणार आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, फुकेत दिल्ली एअर इंडियाचा मुख्य वैमानिक वैयक्तिक समस्यांनी ग्रस्त होता. त्यामुळे त्याने झोपेच्या गोळ्या घेतल्या होत्या. झोपेच्या गोळ्यांमुळे वैमानिकाची पहिली आणि दुसरी डॉप टेस्ट सकारात्मक आली. शिवाय इतर सह विमान कर्मचाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार वैमानिकाचे वर्तन तपासण्यात येणार आहे.

# अपात्र होणाऱ्या व्यक्तीला मुख्यमंत्री करण्यात आले, कपिल सिब्बलांचा युक्तिवाद

## सर्वोच्च न्यायालयात निवडणूक आयोगाच्या निर्णयाची चिरफाड

नवी दिल्ली दि.१३ (वृत्तसंस्था)- निवडणूक आयोगाकडे कोणतेही अधिकारक्षेत्र नव्हतं, मात्र केवळ एकनाथ शिंदे यांना लाभ मिळवून देण्यासाठी निवडणूक आयोगाने त्यांच्या अधिकाराबाहेरचा निर्णय घेतला, असा युक्तिवाद ठाकरेंचे वकील कपिल सिब्बल यांनी केला. एकनाथ शिंदे यांनी २०१८ ची घटना मान्य नव्हती तर त्यावेळी का आक्षेप घेतला नाही? त्यांनी कोणत्या आधारे स्वतःची वेगळी कार्यकारिणी जाहीर केली? असा सवालही कपिल सिब्बल यांनी केला. कपिल सिब्बल यांनी ठाकरेंच्या शिवसेनेच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात युक्तिवाद केला. निवडणूक आयोगाचा निर्णय कसा चुकीचा होता, आणि त्यानुसार त्यावेळचे आमदार कसे अपात्र होते, हे सांगण्याकडे कपिल सिब्बल यांचा रोख होता.

एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर शिवसेनेत दोन गट पडले. त्यावेळी निवडणूक आयोगाने शिवसेना पक्ष आणि चिन्ह हे शिंदेंच्या गटाला बहाल केलं. यावर ठाकरे गटाने आक्षेप घेतला असून त्यासंबंधीची सुनावणी आता सर्वोच्च न्यायालयात अंतिम टप्प्यात आली आहे. ठाकरेंच्या गटाकडून जेष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यांनी युक्तिवाद केला.

एकनाथ शिंदे यांना फक्त आमदारांच्या संख्येवर मुख्यमंत्रिपद देण्यात आलं. परंतु, ग्राऊंडवरील परिस्थिती वेगळी होती. पक्षफुटीनंतरच्या गोष्टी लक्षात घेऊ नका असं कोर्टाने सांगितलं होतं. मात्र निवडणूक आयोगाने त्याच गोष्टींच्या आधारे निर्णय घेतला. दहाव्या अनुसूचीनुसार, अपात्र ठरणाऱ्या व्यक्तीला फक्त आमदारांच्या संख्येच्या आधारे मुख्यमंत्रिपद देण्यात आलं, असा मोठा दावा कपिल सिब्बल यांनी केला. तसेच शिवसेनेच्या फुटीनंतर वाद होता तर पक्षाची नोंदणी रद्द न करता तो शिंदेंच्या शिवसेनेकडे देण्यात आला, असा युक्तिवाद सिब्बल यांनी केला.

एकनाथ शिंदे यांनी बंड केल्यानंतर त्यांनी २०१८ ची घटना ही मान्य नसल्याचं सांगितलं. परंतु त्याच आधारे ते आमदार आणि मंत्री बनले होते. पक्षाच्या संविधानानुसार पक्षाचे कामकाज चालतं. त्यावेळी एकनाथ शिंदे यांना कोणताही आक्षेप नव्हता. परंतु विधिमंडळात फूट पडल्यानंतर एकनाथ शिंदे यांनी २०१८ ची पक्षाची घटना मान्य नसल्याचं सांगितलं.

निवडणूक आयोगाने या प्रकरणात निर्णय देताना जनता दलाच्या १९९४ सालच्या केसचा संदर्भ दिला. परंतु शिवसेनेच्या प्रकरणात जनता दलाच्या केसचा काहीच संबंध नव्हता, त्यांचा संदर्भ देणं हे चुकीचं होतं, असा युक्तिवाद कपिल सिब्बल यांनी केला.

एकनाथ शिंदे यांनी २०१८ ची घटना नाकारली आणि स्वतःची कार्यकारिणी जाहीर केली. ती कोणत्या आधारावर तयार करण्यात आली, असा सवाल कपिल सिब्बल यांनी केला. जनता दलाचा निर्णय आम्हाला लागू होत नाही. जनता दल, समाजवादी पार्टी आणि शिवसेना प्रकरणात अनेक गोष्टी वेगवेगळ्या आहेत. त्याचा संदर्भ या प्रकरणात लागू होत नाही. गेल्या चार वर्षात अनेक पक्षफुटीच्या घटना समोर आल्या आहेत. त्यामध्ये बऱ्यापैकी साम्य आहे असा मुद्दा सिब्बल यांनी न्यायालयात मांडला.

### निवडणूक आयोगाने निर्णय आधी ठरवला होता-संजय राऊत

सर्वोच्च न्यायालयात आज झालेल्या सुनावणीनंतर खासदार संजय राऊत यांनी माध्यमांशी संवाद साधत मोठं भाष्य केलं आहे. 'निवडणूक आयोगाचा निर्णय आधीच ठरलेला होता, त्यानंतर एकनाथ शिंदे हे गुवाहाटीला गेले', असा गंभीर आरोप राऊतांनी केला. मात्र, 'आमचाच विजय होईल', असंही संजय राऊतांनी म्हटलं आहे.

''सर्वोच्च न्यायालयात आज सुनावणी पार पडली, आज आमचा जो युक्तिवाद होता, तो युक्तिवाद निवडणूक आयोगाच्या प्रत्येक बेकायदेशीर कृतीबाबत होता. या देशातील निवडणूक आयोगाने निःपक्षपातीपणे काम करण्याची गरज आहे. मात्र, निवडणूक आयोगाने शिवसेनेच्याबाबतीत किती बेकायदेशीरपणे काम केलं हे सर्वांनी पाहिलं. पक्षपातीपणे निर्णय देऊन एका बेकायदा गटाला मान्यता देण्याचा प्रयत्न केला. यासंदर्भात कपिल सिब्बल यांनी युक्तिवाद केला आहे. याबाबत सर्वोच्च न्यायालयात काही उदाहरणंही दिले आहेत. कपिल सिब्बल यांच्या युक्तिवादामुळे सर्वोच्च न्यायालयाचंही समाधान झालं असं आम्हाला जाणवलं. आता पुढची सुनावणी मंगळवारी होईल'', अशी माहिती संजय राऊत यांनी दिली.

या प्रकरणामध्ये कोणाची जास्त चुकी आहे असं तुम्हाला वाटतं असा प्रश्न पत्रकारांनी विचारला. यावर बोलताना संजय राऊत म्हणाले की, ''निवडणूक आयोगाने शे खाल्लं. याची किंमत मी सकाळी सांगितली. हा खूप मोठा भ्रष्टाचार आहे. देशाच्या संविधानावर हात ठेवून केलेला हा भ्रष्टाचार आहे. निवडणूक आयोगाने एक बेकायदेशीर मार्ग तयार केला. त्या मार्गावरून ते गेले आणि एका बेकायदेशीर गटाला पक्ष म्हणून मान्यता दिली'', असा आरोप संजय राऊत यांनी केला.

# संसदेच्या पावसाळी अधिवेशनाचे सूप वाजले

## लोकसभेचे कामकाज शेवटच्या दिवशी फक्त एका मिनिटात संपले



नवी दिल्ली दि.१३ (वृत्तसंस्था)- पावसाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी, लोकसभेचे कामकाज केवळ एक मिनिट चालले. सभापती ओम बिरला यांनी वंदे मातरम गाण्याचा आदेश दिला आणि त्यानंतर कामकाज अनिश्चित काळासाठी तहकूब केले. पीएम मोदी-शाह, संपूर्ण मंत्रिमंडळ आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी लोकसभेत उपस्थित होते. दुसरीकडे, आज (१३ ऑगस्ट) संसद परिसरात सत्ताधारी आणि विरोधी पक्षांच्या खासदारांनी आंदोलन केले. २० जुलै रोजी अधिवेशन सुरू झाल्यापासून, जंतर मंतर येथील आंदोलनात विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलीस कारवाई आणि राम मंदिरातील लुटीवरून विरोधी पक्षांनी हल्लाबोल केला आहे. दरम्यान, झारखंडमध्ये विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीचार्जच्या विरोधात एनडीएच्या खासदारांनी आंदोलन केले. दरम्यान, राज्यसभेत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी उत्तराखंडमधील हल्द्वानीत त्यांच्या कार्यक्रमानंतर झालेल्या शुद्धीकरणाचा मुद्दा उपस्थित केला. सभागृहात एमएमडीआर दुरुस्ती विधेयक मंजूर करण्यात आले. यानंतर कामकाज अनिश्चित काळासाठी तहकूब करण्यात आले.

लोकसभेच्या पावसाळी अधिवेशनात १९ बैठका झाल्या. सभागृहाचे कामकाज साधारणपणे सकाळी ११ ते सायंकाळी ६ पर्यंत चालते. दुपारी १ ते २ या वेळेत जेवणाची सुट्टी असते. याचा अर्थ, दिवसाला अंदाजे ६ तासांचे कामकाज चालते. यानुसार, १९ बैठकांमध्ये अंदाजे ११४ तासांचे कामकाज होणे अपेक्षित होते, परंतु केवळ सुमारे १७ तास आणि ३० मिनिटांचेच कामकाज झाले. याचा अर्थ, अंदाजे ९६ तास आणि ३० मिनिटांचे कामकाज कमी झाले. २०२५ चे पावसाळी अधिवेशन २१ जुलै ते २१ ऑगस्ट २०२५ या कालावधीत झाले. लोकसभा आणि राज्यसभेच्या प्रत्येकी २१ बैठका झाल्या. लोकसभेत केवळ ३७ तासांचे कामकाज झाले.

दरम्यान, संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी एनडीए आणि विरोधी पक्षांच्या खासदारांमधील संघर्ष सुरूच होता. गुरुवारी (१३ ऑगस्ट) निषेधार्थ दोन्ही बाजूंचे खासदार एकमेकांशी भिडले, ज्यामुळे जोरदार घोषणाबाजी झाली. सुरक्षा रक्षक ढालीप्रमाणे मध्ये उभे होते. दिल्लीतील लाठीचार्जवर अमित शाह यांच्या निवेदनाची मागणी करत आणि राम मंदिराच्या देणग्यांच्या चोरीवर चर्चा करण्याची मागणी करत विरोधी पक्षाने घोषणाबाजी केली. आंदोलनानंतर सर्व खासदार लोकसभेत परतले. कामकाजाची सुरुवात गदारोळात झाली, परंतु नंतर वंदे मातरमच्या घोषणेने काही काळासाठी शांतता प्रस्थापित झाली. पंतप्रधान मोदी आणि अमित शाह यांचेही आज आगमन झाले. तथापि, त्यानंतर सभागृहाचे कामकाज अनिश्चित काळासाठी तहकूब करण्यात आले.

## परतीचा पाऊस बॅकलॉग भरणार; ज्येष्ठ हवामान तज्ज्ञ पंजाब डख यांचा अंदाज

मुंबई दि.१३ (प्रतिनिधी)- राज्यात एकीकडे कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रात धो-धो पाऊस आहे. त्याचवेळी विदर्भ आणि मराठवाड्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्याने शेतकरी हवालदिल आणि चिंतातूर झाला आहे. याच अस्मानी संकटाच्या सावटात असलेल्या विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी एक आनंदाची बातमी आहे. सप्टेंबरनंतरचा परतीचा पाऊस विदर्भ आणि मराठवाड्यात चांगलाच बरसणार असल्याचा अंदाज ज्येष्ठ हवामान तज्ज्ञ पंजाबराव डख यांनी व्यक्त केला आहे.

परतीच्या पावसामुळे विदर्भ आणि मराठवाड्यातील धरणांमधला पाणीसाठा वाढणार असल्याची माहितीही पंजाबराव डख यांनी दिली. परतीच्या पावसाचा फायदा खरीप आणि रब्बी अशा दोन्ही हंगामांना होणार असल्याचं ते म्हणाले.

दरम्यान, आज रात्रीपासून १५ ऑगस्टच्या रात्रीपर्यंत विदर्भात चांगला पाऊस होणार असल्याचा अंदाज त्यांनी व्यक्त केलाय. हा पाऊस सोयाबीनच्या पिकाला जीवनदान देणारा असल्याचं ते म्हणालेत. यासोबतच देशभरातील एल-निनोचा धोका टाळण्यासाठी सरकारने जास्तीत जास्त वृक्षारोपण आणि इतर उपायांवर लक्ष केंद्रित करण्याच्या आवश्यकतेवर पंजाबराव डख यांनी भर दिला.

# हिंगोलीत शक्तीपीठ महामार्गाला जोरदार विरोध

## अल्पभूधारकांनी खायचे काय? सवाल करत मोजणीसाठी आलेले महसूल पथक शेतकऱ्यांनी पाठवले परत

हिंगोली दि.१३ (प्रतिनिधी)- कळमनुरी तालुक्यातील बहुतांश शेतकरी हे अल्पभूधारक असून कोणाकडे एक तर कोणाकडे दोनच एकर जमीन आहे. महामार्गासाठी त्यांच्या जमिनी संपादित केल्या तर त्यांनी खायचे काय आणि उदरनिर्वाह कसा करायचा? आमचा कर्मचाऱ्यांना विरोध नाही, तर शक्तीपीठ महामार्गाला विरोध आहे. त्यामुळे तुम्ही मोजणी न करता परत जा आणि शेतकऱ्यांचा या योजनेला तीव्र विरोध असल्याचा अहवाल वरिष्ठांना द्या, असा आक्रमक पवित्रा घेत आमदार संतोष बांगर आणि संतप्त शेतकऱ्यांनी कांडली व बऊर शिवारात मोजणीसाठी आलेल्या महसूल विभागाच्या पथकाला गुरुवारी (ता. १३) रिकाम्या हाताने परत पाठवले.

कळमनुरी तालुक्यातील अनेक गावांतून प्रस्तावित शक्तीपीठ महामार्ग जात आहे. या महामार्गासाठी जमीन मोजणी आणि संपादनाचे काम महसूल विभागाने हाती घेतले आहे. मात्र, जमिनी गेल्यास उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न निर्माण होणार असल्याने शेतकऱ्यांनी सुरुवातीपासूनच या महामार्गासाठी एक इंचही जमीन न देण्याची ठाम भूमिका घेतली आहे.

गुरुवारी महसूल विभागाचे पथक कांडली आणि बऊर शिवारात जमिनीची मोजणी करण्यासाठी दाखल झाले होते. ही माहिती मिळताच परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने एकत्र आले. शेतकऱ्यांच्या सोबतीला आमदार संतोष बांगर, माजी सभापती संजय बोंढारे, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक अभय सावंत, माजी पंचायत समिती सदस्य राहुल उर्फ पिंटू पतंगे, आखाडा बाळापूरचे माजी उपसरपंच विजय बोंढारे यांच्यासह अनेक स्थानिक नेते घटनास्थळी पोहोचले. यावेळी उपस्थितांनी जमीन मोजणी करू देणार नाही अशी आक्रमक भूमिका घेतली. महसूल कर्मचाऱ्यांनी समजूत काढण्याचा प्रयत्न केला, परंतु शेतकरी आणि लोकप्रतिनिधी ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हते.

आमदार संतोष बांगर यांनी महसूल कर्मचाऱ्यांशी संवाद साधताना शेतकऱ्यांच्या व्यथा मांडल्या. अल्पभूधारक शेतकऱ्यांची जमीन गेल्यास त्यांच्यावर उपासमारीची वेळ येईल, असे सांगत त्यांनी मोजणीची प्रक्रिया तातडीने थांबवण्यास सांगितले. लोकप्रतिनिधी आणि गावकऱ्यांचा तीव्र विरोध पाहता महसूल विभागाच्या पथकाने मोजणी न करताच तेथून काढता पाय घेतला.

## आरजी कर हॉस्पिटलमधील बलात्कार प्रकरणी तृणमूल काँग्रेसचे माजी आमदार निर्मल घोष यांना अटक

कोलकाता दि.१३ (वृत्तसंस्था)- कोलकाता येथील आर.जी. कर वैद्यकीय महाविद्यालय आणि हॉस्पिटलमध्ये ऑगस्ट २०२४ मध्ये एका महिला प्रशिक्षणार्थी डॉक्टरवर बलात्कार करून तिची हत्या करण्यात आल्याची घटना घडली होती. या घटनेनंतर देशभरात मोठी खळबळ उडाली होती. या प्रकरणातील आरोपी संजय रॉयला न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा ठोठावली आहे. या प्रकरणात आता दोन वर्षांनंतर आणखी एक कारवाई करण्यात आली आहे. आर.जी.कर वैद्यकीय महाविद्यालय आणि हॉस्पिटलमध्ये घडलेल्या या घटनेनंतर डॉक्टरच्या मृतदेहावर कथितरीत्या घाईघाईने अंत्यसंस्कार केल्याप्रकरणी तृणमूल काँग्रेसचे माजी आमदार निर्मल घोष यांना गुरुवारी अटक करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. मृत डॉक्टरच्या वडिलांनी या संदर्भात तक्रार दाखल केली होती, त्यानंतर ही कारवाई करण्यात आली आहे. या संदर्भातील वृत्त टाइम्स ऑफ इंडियाने दिलं आहे.

पीडित डॉक्टरच्या स्मरणार्थ आयोजित एका कार्यक्रमात उपस्थित असताना मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांनी पोलीस आयुक्तांना या कथित घाईघाईने केलेल्या अंत्यसंस्काराच्या आरोपांची चौकशी करण्याचे निर्देश दिले होते. तसेच दुसऱ्या शवविच्छेदनाची शक्यता टाळण्यासाठी आणि पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने घाईने अंत्यसंस्कार करण्यात आल्याचा आरोप पीडितेच्या वडिलांनी केला होता.

## नांदेड गुरुद्वारात पंजाबचे माजी उपमुख्यमंत्री सुखबीर सिंग बादल यांच्यावर तलवारीने हल्ला

नांदेड दि.१३ (प्रतिनिधी)- पंजाबचे माजी उपमुख्यमंत्री आणि शिरोमणी अकाली दल या राजकीय पक्षाचे अध्यक्ष सुखबीर सिंग बादल यांच्यावर नांदेडमधील गुरुद्वारामध्ये जीवघेणा हल्ला करण्यात आला. निहंग शीख असलेल्या ६२ वर्षीय जसपाल सिंग यांनी आपल्या जवळील कृपाणने (तलवार) सुखबीर सिंग बादल यांच्यावर अचानक हल्ला केला. ज्यात बादल यांच्या हाताला आणि खांद्याला दुखापत झाली. या हल्ल्यानंतर त्यांना नांदेडमधील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. दरम्यान हल्लेखोर जसपाल सिंग यांना अटक करण्यात आली असून ते मूळचे पुण्यातील असल्याची माहिती समोर आली आहे.

इंडिया टुडेने दिलेल्या बातमीनुसार, जसपाल सिंग पुण्यातील असून येथील न्यायालयात त्यांनी काही काळ वकिली केली आहे. दोन वर्षांपासून नांदेडजवळील मुगत येथील माता साहिब देवन जी गुरुद्वाराशी ते संबंधित आहेत.

आज सकाळी सुखबीर सिंग बादल हे नांदेडमधील तख्त सचखंड श्री हजूर साहेब गुरुद्वारामध्ये दर्शनासाठी आपल्या कुटुंबासह आले होते. सकाळी ११ वाजून १७ मिनिटांनी त्यांनी आपल्या एक्स अकाऊंटवर गुरुद्वारात त्यांचा सत्कार झाल्याचा व्हिडीओ शेअर केला होता. त्यानंतर दुपारी १.४५ वाजता ते गुरुद्वारातून बाहेर येत असताना त्यांच्यावर हल्ला झाल्याची माहिती मिळाली.

जसपाल सिंग हे सुखबीर सिंग बादल यांच्या जवळ गेले आणि त्यांनी कृपाणने त्यांच्यावर हल्ला केला. बादल यांच्या सुरक्षेसाठी तैनात असलेल्या सुरक्षा रक्षकांनी तात्काळ हस्तक्षेप करत मारेकरी जसपाल सिंग यांच्यावर ताबा मिळवला. यात महाराष्ट्र पोलीस दलातील अधिकारी संतोष केंद्रे जखमी झाल्याची माहिती समोर येत आहे. पोलिसांनी हल्लेखोर जसपास सिंगला ताब्यात घेतले असून त्यांची चौकशी केली. 'मला वाटले म्हणून मी त्यांच्यावर हल्ला केला', अशी एकच प्रतिक्रिया हल्लेखोर जसपाल सिंग यांनी दिली असल्याचे वृत्त आहे. मात्र पोलिसांना हल्लेखोराचे विधान मोघम वाटत असून तो खरे कारण सांगत नसल्याचा संशय आहे. त्यामुळे पोलीस खऱ्या कारणाचा शोध घेत आहेत.

## अमेरिका-इराण युद्धात भारताने मोठी संधी गमावली-राहुल गांधी



नवी दिल्ली दि.१३ (वृत्तसंस्था)- काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज देशाच्या परराष्ट्र धोरणावरून केंद्र सरकारवर टीका केली. फेब्रुवारी महिन्याच्या अखेरीस अमेरिका आणि इराण यांच्यात सुरू झाल ेल्या युद्धादरम्यान, भारताने दोन्ही देशांशी असलेल्या संबंधांचा वापर करत संघर्ष थांबवण्याची मोठी संधी भारताने गमावली. हा संघर्ष थांबवण्यासाठी पाकिस्तान मध्यस्थ म्हणून समोर आला आणि केंद्र सरकार लांबून नुसते बघ्याच्या भूमिकेत राहिले, अशी टीका राहुल गांधी यांनी केली.

आज रचनात्मक काँग्रेसच्या अधिवेशनात राहुल गांधी यांचे भाषण झाले. गेल्या अनेक महिन्यांपासून सुरू असलेल्या अमेरिका आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या संघर्षादरम्यान हा संघर्ष थांबवण्यासाठी दोन्ही देशांशी असलेल्या चांगल्या संबंधांचा वापर करून घेण्यात भारत अपयशी ठरला, अशी टीका त्यांनी केली. यावेळी माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वाचीही आठवण राहुल गांधी यांनी काढली.

ते म्हणाले की, इराण युद्ध सुरू असताना भारताला स्वत:ची ताकद समजली असती आणि देशाला इंदिरा गांधी यांच्यासारखे खंबीर नेतृत्व लाभले असते, तर भारतासाठी जागतिक पातळीवर ही मोठी संधी ठरली असती. मात्र या संघर्षात पाकिस्तानने मध्यस्थी करण्याची संधी साधली आणि केंद्र सरकार असं कसं घडलं हे लांबून पाहत राहिले.

खरंतर इराण हा आपला जुना मित्र आहे. तसेच अमेरिका आणि रशिया हेसुद्धा आपले मित्र आहेत. त्यामुळे या देशांशी असलेल्या संबंधांचा वापर करून भारताने हा संघर्ष थांबवायला हवा होता. मात्र भारताऐवजी पाकिस्तानने मध्यस्थी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली, असे राहुल गांधी यांनी नमूद केले.

## सत्तेतील एकनाथ शिंदे आणि दादांच्या राष्ट्रवादीची अवस्था दाताच्या कवळीसारखी, मनोज जरांगेंचं टीकास्त्र

मुंबई दि.१३ (प्रतिनिधी)- सत्तेत सहभागी असलेल्या एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना गटासह अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस गटाची भाजपकडून कोंडी केली जात असल्याचा आरोप मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एकनाथ शिंदे यांच्याकडून काम करून घेतले आणि आता त्यांना 'तुम्ही कुठेही जा, आम्हाला फरक पडत नाही', अशा पद्धतीने वागणूक दिली जात असल्याचा गंभीर आरोप जरांगे पाटील यांनी केला. मनोज जरांगे पाटील म्हणाले की, सत्तेत एकनाथ शिंदे आणि अजित पवार गटाचे भाजपकडून खूप हाल होत आहेत. फडणवीस यांनी एकनाथ शिंदेंकडून त्यांचे काम करून घेतले. सत्तेत आले, आता म्हणतायेत तुम्ही कुठेही जा. आम्हाला फरक पडत नाही, असे त्यांनी म्हटले. जरांगे यांनी एका व्यापाऱ्याचे उदाहरण देत म्हटले की, व्यापारी कवळी बसवायला डॉक्टरकडे जातो आणि कवळी बसवून झाल्यावर मला नको म्हणतो. तशी अवस्था फडणवीस यांनी एकनाथ शिंदे यांची केली असून आता माझे काम झाले, तुला कुठे जायचे तिथे जा, असे फडणवीस वागू लागले आहेत, असा आरोप त्यांनी केला.

## 'सुगौली कराराची मूळ कागदपत्रे गायब?'; भारत-नेपाळ सीमावादावर काठमांडूमध्ये खळबळ; बालेन सरकारची संसदेत मोठी कबुली!

काठमांडु दि.१३ (वृत्तसंस्था)- नेपाळचे पंतप्रधान बालेन शाह सरकारच्या काळात भारत-नेपाळ संबंधांना नवे वळण मिळाले आहे. लिपुलेख, कालापानी आणि लिम्पियाधुरा हे भारताचे भाग आपले असल्याचा दावा नेपाळ करत होता. मात्र, ज्या १८१६ च्या ऐतिहासिक 'सुगौली करारा'च्या आधारे तो हा दावा करत होता, त्या कराराचे मूळ अधिकृत दस्तऐवज स्वतः नेपाळ सरकारकडे उपलब्ध आहेत की नाही, यासंदर्भात शंका निर्माण झाली आहे.

नेपाळचे परराष्ट्र मंत्री शिशिर खनाल यांनी नेपाळच्या संसदेत यासंदर्भात माहिती दिली. ते म्हणाले, 'कराराची मूळ कागदपत्रे सरकारकडे आहेत की नाही, हे सरकार निश्चितपणे सांगू शकत नाही.' 'द काठमांडू पोस्ट'ने दिलेल्या वृत्तानुसार, खनाल संसदेत म्हणाले की, 'नेपाळ सरकारकडे अधिकृत कराराची कागदपत्रे आहेत की नाही, यासंदर्भात कोणतीही स्पष्ट माहिती नाही. काही करारांशी संबंधित कागदपत्रे राष्ट्रीय अभिलेखागारात ठेवल्याचे पुरावे आहेत. मात्र, ते खरोखरच अधिकृत करार आहेत की नाही, यासंदर्भात आपल्याकडे कुठलीही स्पष्ट माहिती नाही.' ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी आणि नेपाळ यांच्यात १८१६ साली झालेल्या या सुगौली करारानुसार, हा सीमावाद मुख्यत्वे काली अथवा महाकाली नदीच्या उगमावर अवलंबून आहे, कारण करारानुसार ही नदी नेपाळची पश्चिम सीमा मानण्यात आली होती. के. पी. शर्मा ओली यांच्या कार्यकाळात हा सीमावाद राष्ट्रीय मुद्द्याच्या स्वरुपात समोर आला. नुकताच भारत आणि चीनदरम्यान लि पुलेख खिंडीतून व्यापार पुन्हा सुरू करण्यासंदर्भात करार झाल्यानंतर, नेपाळने याला विरोध दर्शवला होता. महत्वाचे म्हणजे, आता मूळ कराराचे कागदपत्रेच गहाळ असल्याने, या वादाला एक वेगळे वळण मिळाले आहे.

## जरांगेंबद्दल काही बोलायचे नाही, जनता उत्तर शोधेल-बावनकुळे

मुंबई दि.१३ (प्रतिनिधी)- मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांचा नुकताच पश्चिम महाराष्ट्र दौरा झाला. या दौऱ्यात त्यांनी कुणबी प्रमाणपत्रांच्या मुद्यावरुन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर जोरदार टीका केल्याचं पाहायला मिळालं. काल सोलापूर जिल्ह्यातील तांदूळवाडी इथं झालेल्या सभेत मनोज जरांगेंनी बाहुबली चित्रपटातील कल्की स्टाईलने चंद्रशेखर बावनकुळेंची खिल्ली उडवल्याचं पाहायला मिळालं. आआथातू अरअरअर अरअरअर पा पा पा पपप पा तिर्रे अस डायलॉग म्हणत बावनकुळेंवर त्यांनी टीका केली. त्यांच्या या टीकेला महसूलमंत्री बावनकुळेंनी प्रत्युत्तर दिलं आहे.

मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी केलेल्या टीकेवर बावनकुळे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. मला जरांगेंबद्दल काही बोलायचं नाही, वाईट वागायचं नाही, याला जनता उत्तर शोधेल. सरकारं म्हणून राज्य शांत ठेवणे आमची जबाबदारी असल्याचे बावनकुळे म्हणाले. ओबीसी मराठासाठी सरकार काम करत आहे. मराठ्यांच्या ताटातील ओबीसी नाही ओबीसींच्या ताटातील मराठ्यांना द्यायचं नाही, आमचे फडणवीस सरकार दोन्ही समाजाला न्याय देणार असल्याचे मत चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केले.

दरम्यान, माझं व्यंग करुन जर मनोज जरांगेंना टाळ्या मिळत असतील, चांगलं वाटत असेल अजून काय त्यांचा भाव असेल तर त्यांना समाधान मिळत असेल तर त्यांना करु द्या असी प्रतिक्रिया बावनकुळेंनी दिली. राज्यातील कायदा सुव्यवस्था चांगलं ठेवणे सरकारची जबाबदारी आहे, दोन समाज समोरासमोर येऊ नये ही आमची जबाबदारी आहे असेही ते म्हणाले.

## जातनिहाय जनगणना करा,५०टक्के आरक्षण मर्यादा हटवा; मालेगावात ओबीसी संघटना आक्रमक!

मालेगाव दि.१३ (प्रतिनिधी)- सध्या सुरू असलेल्या जनगणना प्रक्रियेतील नोंदीत इतर मागासवर्गीयांचा (ओबीसी) समावेश न केल्याने ओबीसी समाजात असंतोष पसरला आहे. या पार्श्वभूमीवर मालेगाव येथील ओबीसी संघटना व समता परिषदेतर्फे जातनिहाय जनगणना आणि लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण लागू करावे,असा आग्रह धरण्यात आला आहे. या संदर्भात या संघटनांतर्फे अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निवेदन पाठविण्यात आले आहे. देशात ओबीसी समाजाची लोकसंख्या किती आहे, त्याची आकडेवारी विकासाच्या दृष्टीने महत्वाची असल्याचे सर्वच पक्षांच्या नेत्यांकडून वेळोवेळी अधोरेखित केले गेले आहे. तसेच केंद्र सरकारकडून देशात जातनिहाय जनगणना करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, जनगणना आयुक्तांनी जारी केलेल्या अधिसूचनेत अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींचा उल्लेख असला तरी,ओबीसींची गणना करण्याचा उल्लेख टाळण्यात आला आहे. त्यातून केंद्र सरकारने दिलेली आश्वासने फोल ठरल्याचे दिसत आहे. यामुळे ओबीसी समाजामध्ये नाराजीची भावना निर्माण झाली असल्याचे या संघटनांनी निवेदनात नमूद केले आहे.

# अहिल्याबाई होळकर यांनी केलेली शिवोपासना आणि त्यांचे कार्य

शिवाच्या उपासनेतून स्वतःमध्ये चैतन्य निर्माण करून राज्यकारभाराची धुरा समर्थपणे सांभाळणे - अहिल्याबाई होळकर भगवान शिवाच्या भक्त होत्या. त्या प्रतिदिन शिवाची पूजा करत. शिवाच्या उपासनेतून त्यांनी स्वतःमध्ये चैतन्य निर्माण केले होते. त्या चैतन्यशक्तीच्या द्वारेच त्यांनी राज्यकारभाराची धुरा समर्थपणे सांभाळली.

सतत शिवाची पिंडी समवेत ठेवणे आणि शिवाला स्मरून कार्य करणे - कोणतेही कार्य यशस्वीरित्या पूर्ण होण्यासाठी चैतन्यशक्तीची आवश्यकता असते. याची जाणीव अहिल्याबाई यांना होती. त्यांचा भगवंताविषयी भाव होता. 'भगवंताची चित्शक्तीच सतत कार्य करत असते', हा भाव ठेवूनच त्या सतत शिवाची पिंडी समवेत ठेवत असत. भगवान शिवाला स्मरून त्याच्यातील चैतन्य शक्तीद्वारे त्या कार्य करत. यामुळे त्या करत असलेल्या कार्याला यश मिळत गेले. कार्य करतांना त्यांच्यात कुठेच अहंभाव नव्हता. यावरून 'भगवंताच्या चैतन्यामध्ये किती शक्ती आहे', हे लक्षात येते.

स्वतः समवेत सर्वांनी शिवाची उपासना करावी, यासाठी शिवाचे मंदिर बांधणे - स्वतःसमवेतच सर्वांनी चैतन्यशक्तीद्वारे कार्य करावे, शिवाची उपासना करावी, यासाठी त्यांनी शिवाचे मंदिर बांधले. 'मंदिरातील चैतन्यशक्तीचा लाभ सर्व जनतेला होईल आणि आपोआपच सर्व जनता योग्य आचरण करील', अशी त्यांची श्रद्धा होती.



जुन्या देवळांचा जीर्णोद्धार करणे आणि धर्मशाळा बांधणे - अहिल्याबाई होळकर यांनी अनेक जुन्या देवळांचा जीर्णोद्धार केला. प्रजेच्या सुखसुविधांसाठी त्यांनी नदीकिनारी अनेक घाट बांधले, तसेच अनेक धर्मशाळाही बांधल्या. 'राज्यातील जनतेचा खऱ्या अर्थाने विकास कशामुळे होणार आहे ?', याची जाणीव त्यांना असल्यामुळे त्यांनी देवळांचा जीर्णोद्धार आणि धर्मशाळा यांना महत्त्व दिले; कारण त्यातील चैतन्यशक्तीमुळेच लोकांमध्ये जागृती होऊन ते सदाचाराने वागत असत. त्यामुळेच राज्यात शांतता आणि सुव्यवस्था होती अन् प्रजा सुखी होती.

राघोबा पेशवे इंदूरवर स्वारी करणार असल्याचे कळल्यावर अहिल्याबाईंनी त्यांना दिलेल्या सणसणीत उत्तरावरून 'त्यांच्यातील हा कणखरपणा आणि लढवय्या वृत्ती केवळ चैतन्यशक्तीमुळे निर्माण झाली', हे लक्षात येणे - राघोबा पेशवे यांनी इंदूरवर स्वारी करून होळकरांचे राज्य बळकावण्याचा मनसुबा आखल्यावर अहिल्याबाई होळकर यांनी राघोबादादांना पत्राद्वारे सणसणीत उत्तर दिले, 'माझ्याशी लढतांना तुम्ही जिंकलात, तर स्त्रीशी लढून कोणता पुरुषार्थ दाखवणार आहात ? जर तुम्ही या युद्धात हरलात, तर स्त्रीकडून पराजित झाल्यामुळे तुम्हाला जगाला तोंड दाखवता येणार नाही. त्यामुळे युद्ध करण्यापूर्वी विचार करा.' हे पत्र वाचून राघोबांनी युद्ध करण्याचे टाळले. 'एका महिलेमधील हा कणखरपणा आणि लढवय्या वृत्ती ही केवळ चैतन्यशक्तीमुळे निर्माण झाली', हे वेगळे सांगायला नको. त्यामुळेच अहल्याबाई सर्वांसाठीच आदर्श ठरल्या.

भारताची केविलवाणी सद्यःस्थिती सुधारण्यासाठी सर्व शासनकर्त्यांनी अहिल्याबाई होळकरांचा आदर्श समोर ठेवणे आवश्यक !

भारताची अत्यंत केविलवाणी सद्यःस्थिती पाहिल्यास सर्व शासनकर्त्यांनी अहिल्याबाई होळकरांचा आदर्श समोर ठेवणे आवश्यक आहे; कारण आतंकवादी आक्रमण, नक्षलवाद, भ्रष्टाचार, शेतकर्यां च्या समस्या, पर्यावरणातील प्रदूषण इत्यादी अनेक समस्यांमुळे मनुष्याला जिवंत रहाणेही कठीण झालेले आहे. या सर्व समस्यांसाठी कुणाकडे काहीच उपाययोजना नाही. यावर चैतन्यशक्तीला जागृत करणे, हा एकच उपाय आहे; कारण या स्थितीला सावरण्याचे सामर्थ्य केवळ चैतन्यशक्तीत आहे, जी शाश्वआत, चैतन्यमय आणि आनंदमय आहे. यासाठी प्रत्येकाने भगवंताला शरण जाऊन भगवंताची उपासना करणे आवश्यक आहे.

# विद्यार्थ्यांवर गोळीबाराचे आदेश कुणाचे ?

राजधानी दिल्लीत संसदेचे पावसाळी अधिवेशन चालू असताना आणि कडक सुरक्षा व्यवस्था असताना संसद चलो म्हणून निघालेल्या विद्यार्थी आंदोलकांच्या जमावावर प'लेट गन्स कोणाच्या आदेशाने चालवल्या ? तसेच बिहारमधे विद्यार्थी आंदोलकांवर एके ४७ मधून पोलिसांनी केलेला गोळीबार कोणाच्या आदेशाने झाला या प्रश्नावरून विरोधी पक्षाने काहूर उठवले आहे. संसदेच्या अधिवेशनात विरोधकांनी सरकारला कोंडीत पकडले आहे. स्वत: गृहमंत्री अमित शहा यांच्याकडूनच विरोधी पक्षाला उत्तर अपेक्षित आहे. संसद अधिवेशनात विरोधी पक्षाची या मुद्यावरून एकजूट झाली आहे. अमित शहा मस्ट गो, अशी कठोर मागणी लोकसभेत विरोधी पक्षनेते राहुल गांधी केली आहे. विद्यार्थ्यांवर पोलिसांनी केलेला गोळीबार कुणाच्या आदेशाने झाला हे माहिती नसेल तर गृहमंत्र्यांनी त्यांचे अपयश मान्य करून देशाची माफी मागावी. जर त्यांच्या आदेशानेच गोळीबार झाला असेल तर त्यांनी राजीनामा द्यावा असे विरोधी पक्षांचे म्हणणे आहे. जंतरमंतरवरील जेन झी चे आंदोलन देशभर पसरल्यानंतर धर्मेंद्र प्रधान यांना शिक्षणमंत्रीपदाचा राजीनामा देणे भाग पडले. आता विरोधी पक्षाला अमित शहा यांना गृहमंत्रीपदावरून हटवायचे आहे. काँग्रेस, सपा, उबाठा सेना, मम ता ब'नर्जींची तृणमूल काँग्रेस अशा सर्वच विरोधी पक्षांचा अमित शहांच्या कार्यपध्दतीवर अगोदरपासून राग आहेच. विविध राज्यातील राजकीय पक्षाच्या तोडफफोडीमागे त्यांचेच आशीर्वाद आहेत अशी ठाम समजूत विरोधी पक्षांची आहे. विद्यार्थी आंदोलकांवर गोळीबार झाल्याचे निमित्त विरोधी पक्षाला मि ळाले आणि शहा यांच्या राजीनाम्याची जोरदार मागणी सुरू झाली. संसदेत दोन्ही सभागृहात विरोधी पक्षांचे संख्याबळ भाजपाप्रणित एनडीएपेक्षा बरेच कमी आहे. संख्याबळाच्या जोरावर सरकारला जे पाहिजे असते ते साध्य करून घेता येते. जंतरमंतरवरील जेन झीच्या आंदोलनालनापुढे सरकारला झुकावे लागले,

शिक्षणमंत्र्यांना पायउतार व्हावे लागले. आता विरोधी पक्षाने अमित शहांना टार्गेट केले आहे. विरोधी पक्षांनी कितीही ताणून धरले आणि राहुल गांधी व मल्लिकार्जुन खरगे यांनी लोकसभा व राज्यसभा वेठीला धरण्याचा प्रयत्न केला तरी अमित शहांचा राजीनामा शक्य तरी आहे का ? पंतप्रधान नरेंद्र मोदींचे अत्यंत विश्वासु आणि भाजपचे चाणक्य म्हणून ओळखले जाणारे अमित शहा यांना गृहमंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागेल हे विरोधी पक्षाचे स्वप्न रंजन आहे. मात्र अशी मागणी करून जेन झी ची सहानभुती आपल्या पाठीशी राहावी, यासाठी विरोधी पक्षाने अमित शहांना आपल्या हल्ल्याचे लक्ष्य बनवले आहे. लोकसभेत व राज्यसभेत गृहमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी होत असताना ते सभागृहात हजर नव्हते. पण त्यांच्यावर झालेल्या आरोपांना केंद्रीयमंत्री जितेंद्र सिंह, जेपी नड्डा, निशिकांत दुबे हे सडोतोड उत्तरे देत होते. आंदोलकांवर पोलिसांना गोळीबार करण्याचे आदेश कोण दिले, याचाही साधी माहिती विरोधी पक्षनेत्यांना नसावी म्हणून त्यांनी राहुल गांधी यांना फटकारले. आंदोलन हाताबाहेर जात असेल आणि हिंसक बनत असेल तर जिल्हाधिकारी, दंडाधिकारी , एसडीएम पोलिसांना कठोर कारवाईचे आदेश देतात अशी नियमावली असल्याचे त्यांनी विरोधी पक्षाच्या लक्षात आणून दिले. एवढेच नव्हे तर पोलिसांना गोळीबाराचे आदेश गृहमंत्री कधीच देत नाहीत, असेही बजावले. दिल्लीतील जंतरमंतरवर पुन्हा जेन झी जमू लागली आहे आणि पोलीस त्यांना तेथून हटवत आहेत. अमित शहांनी राजीनामा दिला पाहिजे अशी ते मागणी करीत आहे. विद्यार्थ्यांना खिळे लावलेल्या काठ्यांनी पोलिसांनी झोडपून काढले, मुलांना खाली पाडून तुडवले, साध्या कपड्यातील पोलिसांनी विद्यार्थ्यांना पिटून काढले, पोलिसांनीच मुलांवर दगडफफेक केली, अश्रुधूराच्या नळकांड्या फोडल्या, नि:शस्त्र मुला मुलींवर बेछूट लाठीमार केला, सर्वात कहर म्हणजे निरापराध मुलांवर पॅलेट गन्समधून गोळ्या झाडल्या. शेकडो मुलांवर एफआयआर नोंदवले आहेत. मोदी – शहांना उद्देशून अश्लिल व आक्षेपार्ह घोषणा दिल्या म्हणून घरोघरी रात्री उशीरा व पहाटे जाऊन पोलीस मुला– मुलींना पकडून नेत आहेत. यामुळे जेन झी चा सरकारविरोधी पारा आणखीच चढला आहे. मोदी– शहांना सत्तेवरून जावेच लागेल, अशी भाषा या मुलांकडून ऐकायला मिळत आहे. इंदिरा गांधींच्या हत्येनंतर १९८४ मधे दिल्लतीत झालेल्या शीख विरोधी आंदोलनात तब्बल एक हजार पेक्षा जास्त शिखांच्या हत्या झाल्या. त्यावेळी दंगलखोरांना आवरण्यासाठी पोलिसांनी गोळीबार केला होता. तेव्हा पोलिसांच्या गोळीबाराचे खापर भाजपाने पंतप्रधान राजीव गांधीवर फोडले होते. त्यांच्या आदेशाने गोळीबार झाला असे आरोप झाले होते. दिल्ली पोलीस हे केंद्र सरकारच्या अखत्यारीत येतात म्हणून दंगल व हत्याकांड याची जबाबदारी केंद्र सरकारवरच आहे असे भाजपाने म्हटले होते. राम मंदिर आंदोलनाच्या वेळी कारसेवकांवर गोळीबार झाला, शरयु नदीचा रंग रक्ताने लाल झाला असा आरोप तेव्हा भाजपानेच केला होता. उत्तर प्रदेशचे तत्कालीन मुख्यमंत्री मुलायम सिंग यादव यांच्या आदेशाने सारे घडले असे म्हटले होते. मुल्ला मुलायम असे त्यांना संबोधण्यात आले होते. या दोन्ही प्रसंगी पोलिसांना गोळीबाराचे आदेश जिल्हाधिकारी, दंडाधिकारी किंवा एसडीएम यांना असतात असे भाजपाने कधी म्हटले नव्हते. पंतप्रधान, गृहमंत्री किंवा मुख्यमंत्री कधी पोलिसांना गोळीबाराचे आदेश देत नाहीत असे कधी सांगितले नव्हते. आज या दोन्ही प्रसंगाची आठवण काँग्रेस पक्ष करून देत आहे. राहुल गांधी व विरोधी पक्षांनी अमित शहांच्या राजीनाम्याच्या केलेल्या मागणीनंतर भाजपाचे प्रवक्ते संबित पात्रा यांनी पत्रकार परिषत घेऊन गोळीबाराच्या आदेशाचा गृहमंत्र्यांशी संबंध नाही, असे स्पष्ट केले. आणीबाणीत काँग्रेसने हजारोंना तुरूंगात टाकले, शीख विरोधी दंगलीत दिल्लीत हजारो शीखांचे शिरकाण झाले होते, तेव्हा इंदिरा गांधींनी किंवा राजीव गांधींनी कधी माफी मागितली नव्हती, याची आठवण प्रत्युत्तर म्हणून भाजपा करून देत आहे. दुसरीकडे राहुल गांधींनी पत्रकार परिषद घेऊन गोळीबाराचा आदेश अमित शहांनीच दिला व याचे आपणाकडे पुरावे असल्याचे ठासून सांगितले. त्यांनी प्लेट गन्समधून झालेल्या गोळीबारात जे आंदोलक जखमी झाले त्यांना पत्रकार परिषदेत सर्वांसमोर उभे केले व

त्यांच्या अंगावरील जखमा व खुणा दाखवल्या. या जखमींनी पत्रकारांना आपले अनुभवही कथन केले.

संसदेच्या पावसाळी अधिवेशनात पेपर फुटीबद्दल दहा वर्षे तुरूंगवास व दहा कोटी दंडाची शिक्षा ठोठावणारे सुधारणा विधेयक आणि वंदेमातरम गीताचा अवम ान करणाऱ्याला तीन वर्षे तुरूंगवासाची शिक्षा देणारे विधेयकही गोंधळात मंजूर झाले. पण विरोधी पक्ष अमित शहांच्या माफीसाठी अडून बसला आहे. पोलिसांनी विद्यार्थ्यांवर केलेला गोळीबार व आंदोलकांवर दाखल केलेले एफआयआर हा विरोधकांनी प्रतिष्ठेचा मुद्दा बनवला आहे. आंदोलकांवरील गुन्हे काढून घ्यावेत, असा सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिला असला तरी प्रत्येक केस तपासून पडताळणी करून प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत किमान सहा महिने लागणार आहेत. तोपर्यंत आंदोलकांवर गुन्ह्यांची नोंद हा त्यांच्या करिअरमधील मोठा अडथळा असणार आहे. विद्यार्थी आंदोलकांवर गोळीबार करण्याचे आदेश दिले कोणी ? याचे उत्तर स्वत: गृहमंत्री देतील का यावरून मोठा पेच निर्माण झाला आहे.

कॉक्रोच जनता पक्षाचे संस्थापक अभिजीत दीपके यांनी म्हटले आहे– आंदोलकांवरील गुन्हे मागे घेतले नाहीत तर जेन झी ला पुन्हा रस्त्यावर उतरावे लागेल. जेन झी मधे सरकार विरोधात आजही असंतोष खदखदत आहे.

**– डॉ. सुकृत खांडेकर**

# २०२९ साठी भाजपला गरज नवीन चेहऱ्याची!!

**२०१२** मध्ये भाजपच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक मुंबईला यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात चालू होती. नितीन गडकरी त्यावेळी भाजपचे अध्यक्ष होते. सबंध परिसर भाजपच्या झेंड्यानी 'भगवामय' झाला होता. पण जाणवणारी गोष्ट म्हणजे जेवढे झेंडे फडकत होते तेवढे सुद्धा कार्यकर्ते मात्र रस्त्यावर दिसत नव्हते.सर्व काही शांतपणे चालू होते. पण ही शांतता वादळापूर्वीची होती हे कुणाच्या लक्षात आले नाही.मुंबईत नेहमी जे चक्री वादळ येते ते गुजरातमार्गे येते. या बैठकीच्या वेळी सुद्धा गुजरातम धून एक वादळ मुंबईत येऊन दाखल झाले होते. पण ते नैसर्गिक वादळ नसून एक 'मानवी वादळ' होते. या मानवी वादळाचे नाव होते 'नरेंद्र मोदी'. हे वादळ जेव्हा यशवंतराव चव्हाण सेन्टरच्या द्वारावर धडकले तेव्हा जसे वादळामुळे समुद्रात उंचच उंच लाटा निर्माण होतात तशा मानवी सागराच्या लाटाम ागून लाटा आसपासच्या भागात पसरू लागल्या. या लाटा एकच संदेश घेऊन आल्या होत्या तो म्हणजे 'देशका नेता कैसा हो, नरेंद्र मोदी जैसा हो!. 'नरेंद्र मोदी आगे बढो, हम तुम्हारे साथ है' अशा घोषणांनी सर्व परिसर दुमदुमून गेला होता. तिथेच भाजपच्या म्हणजेच पर्यायाने भारताच्या भावी नेतृत्वावर शिक्कामोर्तब झाले, भले त्यावर 'मोहोर' त्यानंतर काही महिन्यांनी म्हणजे सप्टेंबर २०१३ मध्ये उठली असो.

नरेंद्र मोदी आपल्या गुजरातच्या १२ वर्षाच्या 'गुजरात मॉडेल' च्या बळावर भारताच्या राष्ट्रीय आसमंतात विजेसारखे चमकू लागले आणि भाजपने कात टाकली.तोपर्यंत भाजप पक्षाला आलेली मरगळ एका फटक्यात झटकली गेली. भाजपच्या सच्च्या कार्यकर्त्याला सुद्धा केंद्रातील जी सत्ता ही 'मृगजळप्रमाणे' भासत होती ते स्वप्न नसून वास्तव आहे याची जाणीव झाली आणि 'अब की बार मोदी सरकार' हा आत्मविश्वासपूर्ण नारा जन्मास आला.

एक नवीन आणि तुलनेने तरुण असलेल्या नेतृत्वाला जनतेने कौल दिला. तोपर्यंत वयाची ८० वर्षे उलटून गेलेले लालकृष्ण अडवाणी हेच भाजपचा चेहरा होते. कॉंग्रेसला पर्यायाच्या शोधात असलेल्या मतदाराला वयोवृद्ध अडवाणी हा पर्याय म्हणूनच मान्य होत नव्हता.२०१४ मध्ये मतदाराने संधी मिळताच मोदींच्या 'तरुण आश्वासक चेहऱ्यावर विश्वास दाखवला.

२०२९ च्या निवडणुकीच्या वेळी मोदी यांचे वय ८० च्या घरात असेल. त्या निवडणुकीत निम्म्याहून अधिक मतदार हे नवमतदार (फर्स्ट टाइम वोटर्स ) असतील.मोदी यांच्या १५ वर्षातील कार्यकालाबद्दल तसेच त्यांच्या उपलब्धीबद्दल हे मतदार अनभिज्ञ असतील कारण मोदी हे जेव्हा कर्तृत्वाच्या शिखरावर होते तेव्हा हे मतदार बाल्यावस्थेत होते. दुसरे म्हणजे मध्यम वर्ग जो आतापर्यंत मोदींच्या पाठीशी ठामपणे उभा राहिला त्यातील काही घटक दुसऱ्या विकल्पाच्या शोधात असू शकतात. त्यामुळे मध्यमवर्गाची एकगठ्ठा मते भाजपला मिळतीलच असे गृहित धरता येत नाही.

आजच्या अत्यंत प्रवाही कालखंडात परिस्थिती अचानक केव्हाही बदलू शकते. या काळात जनतेला एकाच चेहऱ्याचा कंटाळा येणे स्वाभाविक आहे. त्यातच 'अँटी इनकबेन्सी' चा थोडाफार फटका गृहित धरायला पाहिजे. जसा काळ पुढे पुढे जातो तसे वर्तमान नेतृत्व 'प्रेडिक्टेबल' होत जाते. त्याच्या कार्यपद्धतीत नावीन्य राहात नाही. एकप्रकारे साचलेपणा येतो. हे वास्तव नरेंद्र मोदींनाही लागू पडते.

वरील सर्व गृहितकांचा एकत्रित विचार केल्यास मोदींच्या नेतृत्वाखाली २०२९ ची निवडणूक जिंकणे भाजपला सहजशक्य होईलच असे ठाम पणे सांगता येत नाही म्हणूनच भाजपला २०२९ च्या लोकसभा निवडणुकीनंतर नव्या चेहऱ्याची गरज भासणार आहे. हा नवा चेहरा लोकसभा निवडणुकीनंतर जाहीर केला जाऊ शकतो. कोण असेल हा चेहरा?

सध्या मोदींचा वारसदार म्हणून अमित शाह यांच्याकडे पाहिले जात आहे. ते 'डी फॅक्टो' उप पंतप्रधानच आहेत, पण तेच पुढील पंतप्रधान होतील असे छातीठोकपणे कुणीही सांगू शकणार नाही. श्री शाह कार्यक्षम आहेत, कणखर आहेत, राजकीय डावपेच खेळण्यात तरबेज आहेत, त्यांची पक्षाच्या विचारधारेवर नितांत श्रद्धा आहे, ते ताकाला जाऊन भांडे लपविणाऱ्यांपैकी नाहीत. हे सर्व सकारात्मक गुण असले तरी शाह हे 'मास लीडर ' नाहीत तसेच गुजरातच्या बाहेर त्यांच्या नेतृत्वाला किती पसंती मिळेल त्याचा अंदाज लागणे आताच्या घडीला कठीण आहे.तसेच 'मोदींचा माणूस' ही त्यांची प्रतिमा पुसून काढणे अवघड आहे.

मोदींचे उत्तराधिकारी म्हणून दुसरे नाव चर्चे त आहे ते उत्तर प्रदेशचे विद्यमान मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचे. योगी यांनी गेली दहा वर्षे उत्तर प्रदेश सारख्या अत्यंत संवेदनाशील आणि जातीय उतरंडीच्या राज्याचा उत्कृष्ट कारभार करून दाखवला आहे.राज्यातील कायदा व सुव्यवस्था, आर्थिक धोरणे, विकास, राज्याचे अद्योगिकीकरण याबाबतीत त्यांची कामगिरी अजोड आहे.योगींचे कट्टर विरोधक सुद्धा मान्य करतील की उत्तर प्रदेशात आज महिला जेवढ्या सुरक्षित आहेत तेवढ्या यापूर्वी कधीही नव्हत्या.योगी अत्यंत कार्यक्षम प्रशासक आहेत. त्यांनी उत्तर प्रदेशातील गुन्हेगारांमध्ये कायद्याचा धाक निर्माण केला आहे त्यामुळे पूर्वी उजळ माथ्याने वावरणाऱ्या गुंडाना तोंड लपवायची पाळी आली आहे.

योगींचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे उत्तर प्रदेशचे बजेट 'शिलकीचे'(सरप्लस ) आहे. एवढ्या म ोठ्या राज्यात तुटीचे बजेट नसणे ही अशक्यप्राय गोष्ट वाटेल पण योगींच्या सरकारने ते शक्य करून दाखवले आहे.

मोदींनी जसे गुजरात मॉडेल निर्माण केले तसे योगींनी उत्तर प्रदेश मॉडेल तयार केले आहे. योगी तरुण आहेत, उच्च शिक्षित आहेत. ते मास लीडर आहेत. आसेतू हिमाचल ते लोकप्रिय आहेत हे भारतभर त्यांच्या सभाना होणाऱ्या गर्दीवरून सिद्ध होते.ते तरुणांशी आपली नाळ सहजपणे जोडू शकतील. तसेच कर्मठ सनातनी लोकांना ते आपले तारणहार वाटतात त्यामुळे भाजपची वोट बँक सुरक्षित तर राहीलच पण ती अजून वृद्धिंगत होत जाईल. अजून एक हुकमी एक्का म्हणजे ते संन्यासी आहेत त्यामुळे लोकांना ते अधिक विश्वासार्ह व निस्पृह भासतात. तसेही भारतात उपभोगापेक्षा विरक्तीला जास्त महत्व आहे. अमित शाह यांच्या तुलनेत भारतीय जनमानस योगीना पुढील पंतप्रधान म्हणून अधिक पसंती देईल. २०२७ ची उत्तर प्रदेशची निवडणूक योगी आदित्यनाथ यांच्याच नेतृत्वाखाली लढवली जाईल. त्यानंतर काही दिवसांनी योगीना दिल्लीत घेऊन उत्तर प्रदेशात नवीन नेतृत्व निर्माण करता येईल. योगीना केंद्र सरकारमध्ये काम करण्याची संधी मिळाल्यास त्यांना पुढील जबाबदारी पेलण्यासाठी तयार करता येईल. अजून घोडा मैदान दूर आहे पण मोदी यांच्या जागी २०२९ नंतर योगी आदित्यनाथ हाच भाजपचा व देशाचा नवीन चेहरा असेल ही शक्यता अधिक दृढ आहे,अर्थात मोदी निवृत्त झाले तरच.

**– रघुनंदन भागवत**

# चर्मकार समाजातील गुणवंत व सेवानिवृत्तांचा १६ ऑगस्टला गुणगौरव सोहळा

छत्रपती संभाजीनगर, दि. १३ (प्रतिनिधी) – गुरु रविदास सत्यशोधक समाजाच्या वतीने आरक्षणाचे जनक छत्रपती राजर्षी शाहू महाराज व साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त सकल चर्मकार समाजातील गुणवंत विद्यार्थी तसेच सेवानिवृत्त अधिकारी–कर्मचाऱ्यांचा हार्दिक अभिनंदन व गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

हा सोहळा १६ ऑगस्ट २०२६ रोजी कीर्ती मंगल कार्यालय, टी.व्ही. सेंटर, हडको येथे होणार आहे. चळवळीचे संस्थापक अध्यक्ष, प्रख्यात साहित्यिक व वक्ते सत्यशोधक प्रबोधनकार ॲड. डॉ. पी. एस. चंगोले (नागपूर) यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम होणार असून, मनपा छत्रपती संभाजीनगरचे सेवानिवृत्त मुख्य अभियंता तथा रचना संस्थेचे अध्यक्ष इंजि. एस. डी. पानसडे हे उद्घाटक म्हणून उपस्थित राहणार आहेत.

या गुणगौरव सोहळ्यास गुणवंत विद्यार्थी, सेवानिवृत्त अधिकारी–कर्मचारी तसेच समाजातील बंधू–भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन प्रदेश महासचिव ग. मा. पिंजरकर, सी. एम. रमणे, संतोषराव लोखंडे, बी. सी. वाडेकर, डी. वाय. ठोंबरे, प्रवीण बोर्डे, अशोक वाटाई, सुभाष बरोदे, रमेश डोंगरे, ब्रिजलाल बन्सवाल, हिरालाल कोरोटे, बी. जी. तुपे, हिरालाल गतखने, चंद्रकांत अंबळे, गणेश जाधव, अशोक डांगे, शंकरराव बावस्कर आदींनी केले आहे.


# मराठवाड्यासाठी स्वतंत्र रेल्वे मंडळाच्या मागणीला खासदार संदिपान भुमरे यांचा जोर; रेल्वेमंत्र्यांना स्मरणपत्र

छत्रपती संभाजीनगर, दि. १३ (प्रतिनिधी) – मराठवाड्याच्या रेल्वे विकासाला गती देण्यासाठी मराठवाड्यासाठी स्वतंत्र रेल्वे मंडळ स्थापन करण्यात यावे, या मागणीसाठी खासदार संदिपान भुमरे यांनी रेल भवन दिल्ली येथे केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना पुन्हा स्मरणपत्र देत तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली आहे.

खासदार भुमरे यांनी ८ जुलै २०२६ रोजी रेल्वेमंत्र्यांकडे स्वतंत्र रेल्वे मंडळाच्या मागणीसंदर्भात पत्र सादर केले होते. या पत्रावर अद्याप अपेक्षित कार्यवाही झालेली नसल्याने त्यांनी स्मरणपत्राद्वारे या मागणीला पुन्हा जोर दिला आहे.

दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड येथे ६ जुलै रोजी झालेल्या वार्षिक आढावा बैठकीत मराठवाड्यातील रेल्वे विकासाशी संबंधित विविध प्रश्न आणि मागण्या खासदार संदिपान भुमरे यांच्यासह मराठवाड्यातील सर्व खासदारांनी मांडल्या होत्या. मात्र, अनेक वर्षांपासून सातत्याने मांडल्या जाणाऱ्या मागण्यांवर अपेक्षित गतीने कार्यवाही होत नसल्याने मराठवाड्यासाठी स्वतंत्र रेल्वे विभागाची आवश्यकता असल्याचे भुमरे यांनी या बैठकीत अधोरेखित केले होते.

सध्या मराठवाडा दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड मंडळाच्या कार्यक्षेत्रात येतो. मराठवाड्याची भौगोलिक व्याप्ती, वाढती लोकसंख्या, औद्योगिक विकास, पर्यटनाच्या वाढत्या संधी आणि रेल्वे प्रवाशांच्या वाढत्या गरजा लक्षात घेता स्वतंत्र रेल्वे मंडळ स्थापन करणे आवश्यक असल्याचे भुमरे यांनी म्हटले आहे. स्वतंत्र रेल्वे मंडळामुळे स्थानिक पातळीवर निर्णय प्रक्रिया अधिक गतिमान होण्याबरोबरच नवीन रेल्वे प्रकल्प, रेल्वे मार्गांचे दुहेरीकरण व विद्युतीकरण, स्थानकांचा विकास, प्रवासी सुविधा आणि देखभाल–दुरुस्तीच्या कामांना वेग मिळणार आहे. तसेच छत्रपती




संभाजीनगर, अजिंठा, वेरूळ, दौलताबाद, पैठण, औंढा नागनाथ, परळी वैजनाथ यांसारख्या ऐतिहासिक व धार्मिक पर्यटनस्थळांना रेल्वे कनेक्टिव्हिटीचा मोठा फायदा होणार आहे.

**शेंद्रा–बिडकीन औद्योगिक क्षेत्राच्या विकासालाही मिळणार बळ**

दिल्ली–मुंबई औद्योगिक कॉरिडॉरअंतर्गत शेंद्रा–बिडकीन औद्योगिक क्षेत्रात मोठ्या प्रम ाणावर गुंतवणूक होत आहे. या पार्श्वभूमीवर मालवाहतूक, रेल्वे साइडिंग, माल टर्मिनल, पिट लाईन आणि लॉजिस्टिक सुविधांचा विकास करण्यासाठी स्वतंत्र रेल्वे प्रशासकीय व्यवस्था उपयुक्त ठरेल, असे खासदार भुमरे यांनी स्मरणपत्रात नमूद केले आहे. मराठवाड्यासाठी स्वतंत्र रेल्वे मंडळ स्थापन करण्यासाठी सविस्तर व्यवहार्यता अहवाल (DPR) तयार करून केंद्र सरकारच्या मंजुरीसाठी प्रस्ताव तातडीने सादर करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना द्यावेत, अशी मागणी खासदार संदिपान भुमरे यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली आहे. स्वतंत्र रेल्वे मंडळाचा निर्णय झाल्यास मराठवाड्यातील रेल्वे विकासाबरोबरच उद्योग, पर्यटन, रोजगार आणि एकूणच प्रादेशिक विकासाला मोठी चालना मिळेल, असा विश्वास खासदार भुमरे यांनी व्यक्त केला आहे.

# पुष्पगिरी तीर्थावर १५-१६ ऑगस्टला पट्टविभूषण संस्कार महोत्सव

छत्रपती संभाजीनगर, दि. १३ (प्रतिनीधी) – पुष्पगिरी तीर्थाचे प्रणेते गणाचार्य श्री १०८ पुष्पदंतसागरजी महाराज यांच्या सान्निध्यात, अंतर्मना धार्मिक एवं पारमार्थिक न्यास, पुष्पगिरी तीर्थ यांच्या वतीने जैन संत, तपाचार्य साधनेचे गोमटेश आचार्य श्री १०८ प्रसन्नसागरजी महाराज यांच्या पट्टविभूषण संस्कार महोत्सवाचे भव्य आयोजन १५ व १६ ऑगस्ट २०२६ रोजी करण्यात आले आहे. या दोन दिवसीय ऐतिहासिक धार्मिक व सांस्कृतिक सोहळ्यात देशभरातून साधू-संत, विद्वान, श्रद्धाळू तसेच छत्रपती सभाजीनगर सह देशभरातुन मान्यवर सहभागी होणार आहेत.



महोत्सवाच्या पहिल्या दिवशी शनिवार, १५ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता पट्टविभूषण संस्कार विधी आयोजित करण्यात आला आहे. राजाबाजार जैन पंचायत सचिव व पुष्पगिरी तीर्थचे अध्यक्ष प्रकाश अजमेरा प्रचार–प्रसार सयोजक आकाश जैन नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल, रोमिल जैन यांनी सांगितले की, सायंकाळी ६ वाजता राष्ट्रीय व सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. यावेळी राष्ट्रवाणीचे वरदपुत्र, कविकुल कंठाभरण, ओज मार्तंड व छंद महोदधी डॉ. कुमार विश्वास यांचे विशेष कविसंमेलन होणार आहे. याम ध्ये कवी दीपक दनादन, कवी महेंद्र मधुर आणि कवयित्री सुश्री साक्षी राष्ट्रीय पर्वानिमित्त आपल्या कवितांमधून देशभक्तीचा जागर करणार आहेत.

महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी रविवार, १६ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता पट्टाभिषेक व अनुमोदना महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमात प्रतिष्ठाचार्य पं. श्री प्रदीपजी मधुर, मुंबई व पं. चंद्रप्रकाशजी यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बा. ब्र. श्री तरुण भैयाजी, इंदूर करणार असून आमंत्रित विद्वान म्हणून प्रा. नलिन शास्त्री, दिल्ली उपस्थित राहणार आहेत. या भव्य महोत्सवाला परमपूज्य योगऋषी स्वामी रामदेवजी महाराज, आचार्य बालकृष्णजी महाराज, पतंजली योगपीठ, हरिद्वार, पं. प्रदीप मिश्रा, आंतरराष्ट्रीय शिवकथा वाचक, सीहोर, पूज्य श्री महेश गुरुजी, शिवकथा वाचक, महामंडलेश्वर श्री प्रेमानंदपुरीजी यांच्यासह अनेक संत व विद्वानांचे सान्निध्य व मार्गदर्शन लाभणार आहे.

आयोजनामध्ये परमपूज्य योगऋषी स्वामी रामदेवजी महाराज व आचार्य बालकृष्णजी म हाराज हे पट्टाचार्य संस्कार महोत्सवाचे संरक्षक म्हणून उपस्थित राहणार आहेत. या ऐतिहासिक व दिव्य सोहळ्यास सपरिवार सहभागी होऊन संतांचे दर्शन, आशीर्वाद तसेच विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री पुष्पदंतसागर दिगंबर जैन श्रमण संस्कृती न्यास, पुष्पगिरी तीर्थ व सकल दिगंबर जैन समाज, सोनकच्छ यांच्या वतीने करण्यात आले आहे. ही माहिती राजाबाजार जैन पंचायत सचिव पुष्पगिरी तीर्थचे अध्यक्ष प्रकाश अजमेरा प्रचार–प्रसार सयोजक आकाश जैन नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल, छत्रपती संभाजीनगर यांनी दिली.

# पिंपळे सौदागरच्या कियांश शर्माची श्लोक पठणाव्दारे गिनीज बुकात नोंद




पुणे दि. १३ ( प्रतिनिधी ) भारताच्या प्राचीन संस्कृतीचा आणि अध्यात्माचा वारसा बालवयात जोपासत पिंपळे सौदागर येथील कियांश प्रज्ञेश शर्मा या बालकाने 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड' मध्ये नोंद केली.

संस्कृत श्लोकांच्या अमोघ पठणाने जागतिक विक्रमाची नोंद करणाऱ्या कियांशला अधिकृत गिनीज प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले असून, त्याच्या या अलौकिक यशामुळे संपूर्ण पिंपरी-चिंचवड शहराची मान अभिमानाने उंचावली आहे.

भाजप पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न (बापू) काटे आणि भरत काटे यांनी कियांश शर्मा याचे विशेष कौतुक करत त्याच्या या कामगिरीबद्दल शर्मा कुटुंबाचे अभिनंदन केले आणि बालकाच्या उज्ज्वल भविष्यासाठी उदंड शुभेच्छा दिल्या.

२ फेब्रुवारी २०२६ रोजी वडोदरा येथे आयोजित ऐतिहासिक 'सत्संग दीक्षा समारंभात' भव्य 'संस्कृत श्लोक पठण' उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात कियांशने अत्यंत प्रगल्भ पाठांतर, शुद्ध उच्चारण आणि अढळ शिस्तीच्या जोरावर श्लोक पठण करत या जागतिक विक्रमात आपले नाव सुवर्ण अक्षरांनी कोरले. त्याच्या या अद्भुत यशाची दखल घेत ८ ऑगस्ट २०२६ रोजी आयोजित विशेष भव्य सत्कार समारंभात पूजनीय कोठारी स्वामी यांच्या शुभहस्ते कियांशला 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड'चे अधिकृत प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

# 'हर घर तिरंगा-घर घर तिरंगा' रॅलीने वैजापूर दणाणले







वैजापूर, दि. १३ (प्रतिनिधी) - 'हर घर तिरंगा-घर घर तिरंगा', तिरंगा देशकी शान है-तिरंगा देशका अभिमान है, भारत माता की जय', 'वंदे मातरम' 'तिरंगा फहराएगे-देश आगे बढाएँगे' अशा घोषणा देत व हातात तिरंगा घेत वैजापूर सेंट मोनिका इंग्लिश विद्यालयाचे विद्यार्थी, नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, नगरसेवक, पालिका व इतर शाळांचे शिक्षक यांनी तिरंगा रॅली ने वैजापूरकरांना स्वातंत्र्य दिनाची जागृती करून 'तिरंगा रॅली' चा उद्धेशाने गुरुवार(ता१३) रोजी जागृती केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याला नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी, उपविभागीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी डॉ. अरुण जऱ्हाड, उपनगराध्यक्ष रियाज अकिल शेख, मुख्याधिकारी भागवत बिघोत राजपूत, माजी नगराध्यक्षा शिल्पाताई परदेशी, व सर्व नगरसेवकांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले व 'तिरंगा रॅली' ध्वज दाखविला.

पाऊस सुरू असताना 'भारत मातेच्या जय घोषाने व 'हर घर तिरंगा -घर घर तिरंगा' या घोषणांनी वैजापूर दणाणून सोडण्यात आले.या तिरंगा रॅलीची सांगतारंभ पंचायत समिती सभागृहात डॉ. परदेशी व भागवत बिघोत यांच्या भाषणाने होऊन संचलन कर्ते धोंडीरामसिंह राजपूत यांनी वंदे मातरम व राष्ट्रगीत गाऊन करण्यात आला.

या तिरंगा रॅलीत नगरसेवक दशरथ बनकर, विशाल संचेती, पारस घाटे, बाबासाहेब पुतळे, राजेश गायकवाड, आमिरअली, प्रशांत कंगले, शैलेंस्य तसेच नगरसेविका, ज्योती जोशी, संगीता राजपूत, जयश्री राजपूत, दीपा राजपूत, पूजा त्रिभुवन, मोनाली खैरे, अनिता तांबे, सुरेश तांबे, दिनेश राजपूत, विनोद राजपूत, डॉ.बी.बी. शिंदे, सावन चौधरी, तसेच पर्यवेक्षक किशोर साळुंकर, भाग्यवंत, डी. थोरात, वैशाली पवार, एन, सी.सी. ऑफिसर वकार पठाण शैलीश पोंदे, प्रेम राजपूत, विष्णू आलूले, शंकर जोरे, प्रमोद निकाळे, बी.बी. जाधव यांच्या सह शिक्षक, कर्मचारी, नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या तिरंगा रॅलीचे नियोजन व सूत्र संचलन धोंडीराम सिंह राजपूत यांनी केले, तर आभार मुख्याधिकारी बिघोत यांनी मानले.

# कलम १६३ अंतर्गत मनाई आदेश

छत्रपती संभाजीनगर, दि.१३ (प्रतिनिधी) - काही गट आणि विशेष करुन तृतीयपंथी एकट्याने किंवा एकत्रितपणे एकत्र येऊन लग्न, किंवा इतर धार्मिक प्रसंगी किंवा जन्म- मृत्यू इत्यादी ठिकाणी, सणासुदीच्या प्रसंगी किंवा विशिष्ट धार्मिक कार्यात किंवा कुटुंबातील जन्म-मृत्यू प्रसंगी जाऊन पैशांची मागणी करतात.

तसेच ट्रॉफिक जंक्शन, रोडवर इ. विविध ठिकाणी फिरत आहेत आणि वाहनचालक आणि इतर जाणाऱ्या प्रवाशांना, नागरिकांना त्रास देऊन पैसे देण्यास भाग पाडत आहेत, याची पोलीस प्रशासनाचे गंभीर दखल घेतली असून अशा प्रकारचे उपद्रव रोखण्यासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये अन्वये पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात येत्या दि.१३ ऑगस्ट ते दि.११ ऑक्टोबर पर्यंत असे कृत्य करण्यास प्रतिबंध करण्याचे आदेश पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांनी निर्गमित केले आहेत. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती विरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम २२३ अन्वये गुन्हे दाखल करुन कायदेशीर कारवाई करण्यात येईल,असेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

# श्रीक्षेत्र उपळा कालीमठ येथे नागपंचमीपासून अखंड हरिनाम सप्ताह

## सलग ५० वर्षांपासूनची परंपरा, सुवर्ण महोत्सवी वर्षात विविध कार्यक्रम

कन्नड, दि. १२ (प्रतिनिधी) तालुक्यातील श्रीक्षेत्र उपळा कालीमठ येथे अखंड हरिनाम सप्ताह व श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याची ५० वर्षांपासूनची परंपरा असून, सुवर्ण महोत्सवी वर्षात आठवडाभर विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहे. श्रावण शुद्ध पंचमी, (नागपचंमी) सोमवार, १७ ऑगस्टपासून ते श्रावण शुद्ध द्वादशी, मंगळवार २५ ऑगस्टपर्यंत हा सोहळा पार पडणार आहे.



दैनंदिन कार्यक्रमात पहाटे ४ ते सकाळी ६ काकडा आरती, सकाळी ६ ते ८ वाजता नगरप्रदक्षिणा, सकाळी ८ ते दुपारी १२ ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा, १२ ते १ वाजेदरम्यान श्री संत तुकाराम महाराज गाथा भजन, सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ, त्यानंतर दररोज सायंकाळी ७ ते ८ वाजेदरम्यान महाप्रसाद, रात्री ९ ते ११ वाजेदरम्यान हरिकीर्तन, त्यानंतर भजनी मंडळाचा हरिजागर सोहळा होईल. सोमवार, १७ ऑगस्ट रोजी वेताळ महाराज मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

सोमवार, १७ रोजी हभप. पल्लवी महाराज खरजकर, मंगळवार, १८ रोजी हभप. शीतल महाराज तुपे नाशिक, बुधवार, १९ रोजी हभप. विठ्ठल महाराज घुगे पंढरपूर, गुरुवार, २० रोजी हभप. भोजराज भोले बाबा, शुक्रवार, २१ रोजी हभप. तुकाराम महाराज गुजरंगे लातूर, शनिवार, २२ रोजी हभप. शिवाजी महाराज तळेकर, रविवार, २३ रोजी हभप. रामेश्वर म हाराज तळेकर नावडी, सोमवार, २४ रोजी हभप. ज्ञानेश्वर महाराज राऊत, गणोरी यांचे रात्री ९ ते ११ वाजेपर्यंत हरिकिर्तन होईल. मंगळवार, २५ रोजी सकाळी १० ते १२ वाजेदरम्यान हभप. जगन्नाथ महाराज देशमुख पंढरपूर यांचे काल्याचे किर्तन होईल व त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन केले आहे. या सप्ताहाचे हे ५० वे सुवर्ण महोत्सवी वर्ष असून, या सर्व धार्मिक कार्यक्रमांचा, भजन, कीर्तनाचा, महाप्रसादाचा सर्व भाविकांनी लाभ घेण्याचे आवाहन भजनी मंडळ व समस्त ग्रामस्थ मंडळी, युवक मित्रमंडळ उपळा कालीमठ यांनी केले आहे.

शनिवार, २२ रोजी श्री विठ्ठल रुख्मिणी मंदिराचा ६ वा वर्धापन दिन

उपळा : येथील श्री विठ्ठल रुख्मिणी मंदिराचा ६ वा वर्धापन दिन सोहळा

उपळा कालीमठ येथे शनिवार, २२ ऑगस्ट रोजी आयोजित केला आहे. यावेळी सकाळी ८ ते १० विठ्ठल रुख्मिणी यांना महाअभिषेक पूजा, १० ते १२ हरीकिर्तन आणि त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन केले आहे.

### स्वातंत्र्य दिनानिमित्त छत्रपती संभाजीनगरात होणार 'जैन गौरव गाथागुणानुवाद सभा'

# आचार्य श्री विनम्रसागरजी महाराज ससंघ यांच्या पावन सान्निध्यात विशेष आयोजन; जैन महापुरुषांचे शौर्य, ज्ञान व राष्ट्रसेवेचे होणार गुणानुवाद

छत्रपती संभाजीनगर, दि. १३ (प्रतिनिधी) - स्वातंत्र्य दिनाच्या पावन पर्वानिमित्त छत्रपती संभाजीनगरच्या पवित्र भूमीत जैन समाजाचा गौरवशाली इतिहास, महापुरुषांचे जीवनकार्य तसेच राष्ट्र व समाजासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने 'जैन गौरव गाथाङ्कगुणानुवाद सभा' या भव्य विशेष सभेचे आयोजन करण्यात आले आहे. परमपूज्य आचार्य श्री १०८ विनम्रसागरजी महाराज ससंघ यांच्या पावन सान्निध्यात व सत्संगात हा कार्यक्रम संपन्न होणार आहे. अशी माहिती पचायत अध्यक्ष महावीर पाटनी व विश्वस्त मडळ व चातुर्मास समिती ने केले आहे

१५ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी २ वाजता हिराकाका प्रांगण, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित या सभेत जैन समाजाच्या गौरवशाली इतिहासातील विविध अध्यायांवर प्रकाश टाकण्यात येणार आहे. जैन सम्राट, महाराण्या, वीर योद्धे, सेनानायक, वैज्ञानिक, विद्वान तसेच राष्ट्र व समाजासाठी उल्लेखनीय योगदान देणाऱ्या महान व्यक्तिमत्त्वांच्या जीवनकार्याचे, शौर्याचे, त्यागाचे, ज्ञानाचे व कर्तृत्वाचे गुणानुवाद करण्यात येणार आहेत.

**हुकुमचंद सांवला मुख्य वक्ते**

या सभेचे मुख्य वक्ते व विशेष अतिथी श्री हुकुम चंद सांवला (इंदूर), केंद्रीय वरिष्ठ उपाध्यक्ष, विश्व हिंदू परिषद हे आहेत. इतिहासाचा सखोल अभ्यास व प्रभावी वक्तृत्वासाठी प्रसिद्ध असलेले श्री सांवला 'जैन गौरव गाथा'च्या माध्यमातून अशा महान व्यक्तिम त्वांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग मांडणार आहेत, ज्यांनी आपल्या शौर्य, ज्ञान, विज्ञान, राष्ट्रसेवा, धर्म-संस्कृती आणि समाजसेवेच्या माध्यमातून इतिहासात अमिट ठसा उमटविला.

**नव्या पिढीला गौरवशाली इतिहासाची ओळख**

या सभेत जैन सम्राट व महाराण्यांचा गौरवशाली इतिहास, जैन वीर योद्धे व सेनानायकांचे अद्भुत पराक्रम, जैन वैज्ञानिक व विद्वानांचे ज्ञान-विज्ञानातील योगदान तसेच राष्ट्र व समाजनिर्मितीमध्ये जैन समाजाची भूमिका यावर विशेष प्रकाश टाकण्यात येणार आहे. यासोबतच जैन संस्कृती, संस्कार आणि गौरवशाली परंपरांची नव्या पिढीला ओळख करून देणारे प्रेरणादायी जीवनप्रसंग व संदेशही मांडण्यात येणार आहेत.

आयोजकांच्या मते, 'जैन गौरव गाथा गुणानुवाद सभा' हा केवळ एक कार्यक्रम नसून, आपल्या गौरवशाली इतिहासाची ओळख करून घेणे, आपल्या महापुरुषांचे कार्य समजून घेणे आणि त्यांच्या प्रेरणादायी जीवनमूल्यांचा संदेश भावी पिढीपर्यंत पोहोचविण्याचा एक सार्थक उपक्रम आहे.

स्वातंत्र्य दिनाच्या पावन पर्वावर राष्ट्रगौरवासोबतच जैन गौरवालाही नमन करण्याच्या उद्देशाने आयोजित या सभेस नागरिकांनी सपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित राहून हा ऐतिहासिक व प्रेरणादायी उपक्रम यशस्वी करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाची माहिती - कार्यक्रम : जैन गौरव गाथा गुणानुवाद सभा

दिनांक : १५ ऑगस्ट २०२६, शनिवार

वेळ : दुपारी २.०० वाजता

स्थळ : हिराकाका प्रांगण, छत्रपती संभाजीनगर

पावन सान्निध्य : परमपूज्य आचार्य श्री १०८ विनम्रसागरजी महाराज ससंघ


मुख्य वक्ते : श्री हुकुमचंद सांवला, इंदूर

आयोजन : विनम्र चातुर्मास२०२६

# छत्रपती संभाजीनगर परिमंडलातील वीजग्राहकांना पीएम-सूर्यघर योजनेचे ४१० कोटी अनुदान

**प्रधानमंत्री** सूर्यघर मोफत वीज योजनेला महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर परिमंडलात उत्तम प्रतिसाद मिळाला आहे. परिमंडलातील ५८ हजार ९६७ वीजग्राहकांनी या योजनेचा लाभ घेतला असून त्यांच्याकडील प्रकल्पाची एकूण स्थापित क्षमता २०६ मेगावॅट आहे. ७८ हजार रुपयांपर्यंत अनुदान असलेल्या या योजनेत ४१० कोटींचे अनुदान लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा झाले आहे.

दरमहा तीनशे युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांना मोफत वीज मिळावी आणि अतिरिक्त वीज विकून उत्पन्न मिळावे यासाठी केंद्र सरकारने ही योजना सुरू केलेली आहे. या योजनेत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ४७ हजार ५३० ग्राहकांनी १६६.१२ मेगावॅट तर जालना जिल्ह्यातील ११ हजार ४३७ ग्राहकांनी ३९.८८ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा संच घराच्या छतावर उभारले आहेत. परिमंडलातील ५८ हजार ९६७ ग्राहकांपैकी ५२ हजार ७६३ ग्राहकांच्या बँक खात्यात ४१० कोटी ३३ लाख रुपयांचे अनुदान जमा झाले असून, उर्वरित ग्राहकांचे अनुदान वळते करण्याची प्रक्रिया सुरू आहे.



छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ४२ हजार ६१९ ग्राहकांना ३३१ कोटी ३१ लाख तर जालना जिल्ह्यातील १० हजार १४४ ग्राहकांना ७९ कोटी २ लाख रुपयांचे अनुदान प्राप्त झाले आहे.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत केंद्र सरकारकडून छतावरील सौर ऊर्जा निर्मितीचे संच बसवणाऱ्या वीजग्राहकांना एक किलोवॅटसाठी ३० हजार रुपये, दोन किलोवॅटसाठी ६० हजार रुपये व तीन किलोवॅट किंवा त्यापेक्षा अधिक क्षम तेच्या संचासाठी ७८ हजार रुपये अनुदान मिळते. एक किलोवॅटच्या सौर यंत्रणेतून दरमहा सुमारे १२० युनिट वीज तयार होते. गरजेपेक्षा जास्त वीज तयार झाल्यामुळे वीजबिल जवळपास शून्य होते तसेच अतिरिक्त वीज महावितरणला देता येते. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेला प्रोत्साहन देण्यासाठी ग्राहकांना लागणारे सोलर नेट मीटर महावितरणकडून विनामूल्य पुरवण्यात येत आहेत. त्यामुळे ग्राहकांचे पैसे वाचण्यासोबत त्यांना मोबाईल फोनवरच वीजनिर्मिती, वीज वापर, अतिरिक्त युनिट इत्यादी माहिती दररोज मिळते. त्यानुसार त्यांना वीजबिल कमी करण्यासाठी नियोजन करता येत आहे. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेचा लाभ घेण्यासाठी ग्राहकांना www.Pmsuryaghar.gov.in या वेबसाईटवर नोंदणी करावी लागते. म हावितरण ही या योजनेची अंमलबजावणी करणारी राज्यातील नोडल एजन्सी आहे. महावितरणने यासाठी एक स्वतंत्र पोर्टल तयार केले आहे. त्यामुळे वीज ग्राहकांना व पुरवठादारांना महावितरणच्या कार्यालयात येण्याची आवश्यकता राहत नाही. नोंदणी केल्यापासून अंतिम मंजुरीनंतर प्रकल्प सुरू करेपर्यंत 'फेसलेस' व 'पेपरलेस' पद्धतीने काम चालू राहते. त्यामुळे योजनेच्या अंमलबजावणीत गतिमानता आली आहे. प्रधानमंत्री सूर्यघर योजनेत ग्राहकांना जवळपास मोफत वीज मिळते. शिवाय योजनेत ७८ हजार रुपयांपर्यंत अनुदान आहे. वीजग्राहकांना नेट मीटरही महावितरणकडून देण्यात येते. छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्यातील जास्तीत जास्त वीजग्राहकांनी या योजनेचा लाभ घ्यावा.

**- दीपक कुमठेकर,**
मुख्य अभियंता, महावितरण,
छत्रपती संभाजीनगर परिमंडल

# छत्रपती संभाजीनगर शहरातील अनधिकृत होर्डिंगवर महानगरपालिकेची कठोर कारवाई

छत्रपती संभाजीनगर, दि.१३ (प्रतिनिधी) - छत्रपती संभाजीनगर शहरातील सार्वजनिक ठिकाणी, रस्त्यांच्या कडेला, चौकांमध्ये तसेच महानगरपालिका हद्दीतील विविध ठिकाणी उभारण्यात आलेल्या अनधिकृत होर्डिंग, जाहिरात फलक व बॅनर्सविरोधात छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेमार्फत विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे.

महानगरपालिका प्रशासनाने शहरातील अनधिकृत जाहिरात फलकांची पाहणी करून त्यांची माहिती संकलित करण्यास सुरुवात केली असून, परवानगी न घेता उभारलेले तसेच मंजूर परवानगीच्या अटींचे उल्लंघन करणारे होर्डिंग तातडीने हटविण्याची कारवाई करण्यात येणार आहे.

विशेषतः रस्ते, चौक, पदपथ, सार्वजनिक जागा, शासकीय/महानगरपालिका मालमत्ता तसेच वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या ठिकाणी उभारण्यात आलेल्या अनधिकृत जाहिरात फलकांवर प्राधान्याने कारवाई करण्यात येईल.

या कारवाईदरम्यान संबंधित होर्डिंगधारक, जाहिरातदार, जाहिरात एजन्सी तसेच जागामालक यांची जबाबदारी निश्चित करून, लागू असलेल्या नियमांनुसार दंडात्मक कारवाई, होर्डिंग जप्त करणे व संबंधितांकडून कारवाईचा खर्च वसूल करणे याबाबतची कार्यवाही करण्यात येईल. शहरातील सर्व अधिकृत होर्डिंगधारक व जाहिरातदारांनी महानगरपालिकेची आवश्यक परवानगी घेऊनच जाहिरात फलक उभारावेत. परवानगीशिवाय कोणतेही होर्डिंग किंवा जाहिरात फलक उभारू नयेत, असे आवाहन महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.

तसेच नागरिकांनी त्यांच्या परिसरातील अनधिकृत होर्डिंग, जाहिरात फलक किंवा बॅनर्सची माहिती महानगरपालिकेच्या संबंधित विभागाकडे द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. शहराचे विद्रुपीकरण, वाहतुकीस अडथळा आणि नागरिकांच्या सुरक्षिततेस धोका निर्माण करणाऱ्या अनधिकृत होर्डिंगविरोधात महानगरपालिका प्रशासनाची कारवाई यापुढे अधिक तीव्र करण्यात येणार आहे, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यावेळी म्हणाले.

# राष्ट्रीय ग्रंथपाल दिनानिमित्त संवाद ग्रंथपालांशी; ग्रंथपाल वाचन संस्कृतीचे खरे संवर्धक-डॉ.सुभाष चव्हाण

छत्रपती संभाजीनगर, दि.१३ (प्रतिनिधी) - ग्रंथपालांनी योग्य वाचकाला योग्य वाचन साहित्य द्यायला हवे. प्रत्येक ग्रंथाला त्याचा वाचक मिळाला पाहीजे. यासाठी ग्रंथपालांनी विशेष प्रयत्न करायला हवे कारण ग्रंथपाल हे वाचन संस्कृतीचे खरे संवर्धक होय, असे प्रतिपादन डॉ. सुभाष चव्हाण यांनी केले.



शासकीय विभागीय ग्रंथालयात राष्ट्रीय ग्रंथपाल दिनानिमित्त 'संवाद ग्रंथपालांशी' या कार्यक्रमाचे आयोजन बुधवारी (दि.१२) करण्यात आले. शासकीय विभागीय ग्रंथालय, सहाय्यक ग्रंथालय संचालक कार्यालय, जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय व मॉडर्न संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. उदघाटन डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या ज्ञानस्त्रोत केंद्राचे संचालक डॉ.सुभाष चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले.

अध्यक्षस्थानी छत्रपती संभाजीनगर विभागाचे सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे होते. तर मॉडर्न संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नामदेव सानप, विवेकानंद कॉलेजचे ग्रंथपाल डॉ. गोवर्धन औटे, सेवा निवृत सहाय्यक ग्रंथालय संचालक डॉ. राजशेखर बालेकर, डी. बी. देशपांडे, जिल्हा ग्रंथालय संघाचे संचालक विष्णु बोडखे,दै. लोकमतच्या वरीष्ठ ग्रंथपाल डॉ रमा देशपांडे, शालेय ग्रंथपाल संघटनेचे बाबासाहेब मुळे, खडकेश्वर वाचनालयाच्या ग्रंथपाल समता लोंढे, शिशु विहार माध्यमिक शाळेच्या ग्रंथपाल स्मिता आगलावे, बलवंत वाचनालयाचे ग्रंथपाल भारत सुरवसे आदी मान्यवर प्रमुख अतिथी म्हणुन उपस्थति होते.

याप्रसंगी मोहल्ला लायब्ररीचे संचालक मिर्झा अब्दुल कय्युम नदवी व जीवन विकास ग्रंथालयाचे सहाय्यक ग्रंथपाल ग्रंथमित्र लक्ष्मण मोरे यांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

प्रास्ताविक जिल्हा ग्रंथालय अधिकारी संतोष जाधव यांनी केले.सुत्रसंचालन अनिल बाविस्कर यांनी तर आभार प्रदर्शन मारुती फुलारी यांनी केले. कार्यक्रमास ग्रंथपाल, ग्रंथालयीन कार्यकर्ते, वाचक सभासद, विद्यार्थी तसेच नागरीक मोठया संख्येने उपस्थित होते.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# त्रि-स्तरीय पंचायत राज संस्थांच्या लोकप्रतिनिधींचे जिल्हास्तरीय ‘पंच संमेलन’

## विकसित भारत रोजगार आणि उपजिवीका हमी अभियानाद्वारे गावचा शाश्वत विकास साधावा-रोहयो मंत्री भरत गोगावले

छत्रपती संभाजीनगर दि.१३ (प्रतिनिधी)- ‘विकसित भारत रोजगार आणि उपजीविका हमी अभियान (ग्रामीण)’ राबवितांना गावाची गरज, स्थानिक भौगोलिक परिस्थिती, शेती आणि उपलब्ध नैसर्गिक साधनसंपत्तीचा विचार करून कामांचे नियोजन करावे आणि ग्रामीण भागाचा शाश्वत विकास साधावा,असे आवाहन राज्याचे रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांनी आज येथे केले.

‘विकसित भारत रोजगार आणि उपजीविका हमी अभियान (ग्रामीण)’ राबवून गावाचा विकास करतांना लोकप्रतिनिधींनी गावच्या विकासाचा प्राधान्य क्रम ठरवावा,असे आवाहन राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी केले.

‘विकसित भारत रोजगार आणि उपजीविका हमी अभियान (ग्रामीण) कायदा, २०२५’ बाबत त्रि-स्तरीय पंचायत राज संस्थांमधील लोकप्रतिनिधी व पदाधिकाऱ्यांमध्ये जागरूकता आणि संवेदनशीलता वाढविण्यासाठी मंथन हॉल, एमआयटी, बीड बायपास येथे आयोजित जिल्हास्तरीय ‘पंच संमेलन’ आज पार पडले.

राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट, जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे पाटील, आ. संजना जाधव, आ.विलास भुमरे, रोजगार हमी योजना विभागाचे



सचिव अप्पासाहेब धुळाज, जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी., जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मित्रु पी. एम तसेच पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावरील लोकप्रतिनिधी, पदाधिकारी तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

रोहयो मंत्री गोगावले म्हणाले की, ग्रामीण भागातील नागरिकांना रोजगार उपलब्ध करून देतानाच गावांच्या विकासासाठी कायमस्वरूपी आणि उपयुक्त मालमत्ता निर्माण करणे हा ‘विकसित भारत रोजगार आणि उपजीविका हमी अभियान (ग्रामीण)’चा महत्त्वाचा उद्देश आहे. ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद या त्रि-स्तरीय पंचायत राज संस्थांनी स्थानिक गरजांनुसार कामांचे नियोजन करून अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करावी. ते पुढे म्हणाले की, केंद्र आणि राज्य शासनाच्या समन्वयातून ग्रामीण रोजगार आणि उपजीविकेला अधिक बळ देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. केंद्र शासनाच्या काही निश्चित मार्गदर्शक सूचना व निकष आहेत. क्षेत्रीय स्तरावर येणाऱ्या अडचणी लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून शासनापर्यंत पोहोचवून मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तसेच संबंधित विभागांच्या समन्वयातून त्यावर सकारात्मक मार्ग काढण्यासाठी राज्य शासन सातत्याने प्रयत्नशील आहे. रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून राज्यात यापूर्वी मोठ्या प्रमाणावर कामे करण्यात आली आहेत. केंद्र शासनाचे निकष, प्रलंबित निधी तसेच अन्य तांत्रिक बाबींचा विषय राज्यातील खासदारांमार्फत केंद्र शासनापर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत, असे श्री.गोगावले यांनी सांगितले. पालकमंत्री संजय शिरसाट म्हणाले की, बदलत्या काळानुसार ग्रामपंचायतींची भूमिका आणि अधिकार व्यापक झाले आहेत. गावाच्या विकास प्रक्रियेत सरपंच आणि ग्रामपंचायत सदस्य हे महत्त्वाचे घटक आहेत. गावातील नागरिकांच्या गरजा, स्थानिक प्रश्न आणि आवश्यक विकासकामांची सर्वाधिक माहिती स्थानिक लोकप्रतिनिधींना असते. त्यामुळे उपलब्ध अधिकार, निधी आणि योजनांचा योग्य वापर करून गावाच्या विकासाचा प्राधान्यक्रम निश्चित करावा. ते पुढे म्हणाले की, केंद्र व राज्य शासनाच्या विविध विभागांच्या माध्यमातून ग्रामविकासासाठी मोठ्या प्रमाणावर योजना उपलब्ध आहेत. गावाच्या गरजेनुसार योग्य योजनांची निवड व अभिसरण केल्यास सर्वांगीण विकास साधता येईल. ग्रामपंचायतींनी उपलब्ध योजनांचा लाभ अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचवावा, असे पालकमंत्री शिरसाट यांनी सांगितले.जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे पाटील म्हणाले की, या योजनेच्या माध्यमातून जल व मृदसंधारणाची कामे हाती घेतल्यास त्याचा थेट ल ाभ शेतकऱ्यांना होईल. जमिनीत पाणी मुरविणे, पाण्याची साठवण क्षमता वाढविणे आणि जमिनीचे योग्य व्यवस्थापन यामुळे शेतीच्या उत्पादकतेला चालना मिळेल. रोजगार निर्मिती करतांनाच नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन करणाऱ्या कामांना प्राधान्य द्यावे.

रोजगार हमी योजना विभागाचे सचिव अप्पासाहेब धुळाज म्हणाले की, विकसित महाराष्ट्र आणि त्याद्वारे विकसित भारत ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी ग्रामीण भागात रोजगार आणि ग्रामविकासाला गती देणे आवश्यक आहे. रोहयो अंमलबजावणीत महाराष्ट्राने देशात अग्रणी भूमिका बजावली आहे. नवीन अभियानामध्ये तंत्रज्ञानाचा वापर, पारदर्शकता आणि सामाजिक उत्तरदायित्वाला विशेष महत्त्व आहे. मोबाईल तंत्रज्ञान, कामांची डिजिटल नोंद आणि सामाजिक लेखापरीक्षणामुळे अंमलबजावणी अधिक पारदर्शक व परिणामकारक होत आहे. लोकप्रतिनिधींनी या बदलांची माहिती घेऊन ग्रामपातळीवर प्रभावी अंमल बजावणीसाठी पुढाकार घ्यावा. जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन प्रविणा कन्नडकर यांनी केले. पंच संमेलनात ग्रामीण रोजगार हमी, त्रि-स्तरीय पंचायत राज संस्थांची भूमिका, ग्रामस्तरीय नियोजन व विकास आराखडा, कामांची प्रभावी अंमलबजावणी, पारदर्शकता, सामाजिक देखरेख, सामाजिक उत्तरदायित्व आणि तक्रार निवारण आदी विषयांवर दिवसभराच्या सत्रात मार्गदर्शन व चर्चा करण्यात आली.

# ‘स्वदेशी एक्स्पो’ची तयारी अंतिम टप्प्यात;आज उद्घाटन

## केंद्रीय क्रीडा व युवा कल्याण राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या हस्ते उद्घाटन



छत्रपती संभाजीनगर दि.१३ (प्रतिनिधी)- केंद्रीय सूक्ष्म, लघु व मध्यम उद्यम मंत्राल याच्यावतीने छत्रपती संभाजीनगरमध्ये १४ ते १६ ऑगस्टदरम्यान सागर रिसॉर्ट, एमआयडीसी येथे आयोजित ‘स्वदेशी एक्स्पो २०२६’ची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. देशभरातून ७५ हून अधिक प्रदर्शक यात सहभागी झाले असून नागरिकांसाठी प्रवेश पूर्णपणे मोफत आहे, जास्तीत जास्त नागरिकांना या प्रदर्शनाला भेट द्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

या प्रदर्शनाचे उद्घाटन दि.१४ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता केंद्रीय क्रीडा व युवा कल्याण राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

नॅशनल ज्युट बोर्ड, ट्रायफेड यांसारख्या राष्ट्रीय संस्थांचाही या एक्स्पोमध्ये सहभाग असून त्यांचे सहकार्य लाभले आहे. ओडिशाची पट्टाचित्र, राजस्थानची पिचवाई, झारखंडची सोहराई, बिहारची मधुबनी, उत्तराखंडची ऐपण कला तसेच महाराष्ट्राची पैठणी यांसह विविध राज्यांतील पारंपरिक कला व हस्तकला पाहण्यासोबतच त्यांची खरेदी करण्याची संधी नागरिकांना मिळणार आहे.

एक्स्पोमध्ये सहभागी झालेल्या प्रदर्शकांपैकी ७५ टक्क्यांहून अधिक महिला उद्योजक व ल घुउद्योगांचा समावेश आहे. एक्स्पोदरम्यान फॅशन शोसह विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

दि. १६ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजता क्रीडा व युवा कल्याण राज्यमंत्री रक्षा खडसे या एक्स्पोला भेट देणार असून, त्यांच्या हस्ते विविध स्पर्धांतील विजेत्यांसह देशभरातून आलेल्या कलाकार व कारागिरांचा गौरव करण्यात येणार आहे. तीन दिवस चालणाऱ्या या स्वदेशी हातमाग व हस्तकला प्रदर्शनाला नागरिकांनी मोठ्या संख्येने भेट देऊन स्वदेशी उत्पादनांची खरेदी करावी, पीएचडी चेंबर ऑफ कॉमर्सनेही एक्स्पोला पाठिंबा दिला असून आगामी दिवाळीनिमित्त भेटवस्तू म्हणून स्वदेशी उत्पादनांची खरेदी करून कारागीर व उद्योजकांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहनही प्रशासनाने केले आहे.

# सरकारी लेखा व कोषागारे विभागातर्फे १८ ऑगस्टला एकदिवसीय कार्यशाळा

छत्रपती संभाजीनगर दि.१३ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागांतर्गत विभागीय सहसंचालक, लेखा व कोषागारे, छत्रपती संभाजीनगर विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली सरकारी लेखा व कोषागारे विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

ही कार्यशाळा दि. १८ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे. सरकारी लेखा व कोषागारे विभागातील महत्त्वाच्या विषयांवर कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

या कार्यशाळेस छत्रपती संभाजीनगर जिल्हा कोषागार अधिकारी तसेच आहरण व संवितरण अधिकारी यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन सहसंचालक, लेखा व कोषागारे, छत्रपती संभाजीनगर कार्यालयातर्फे करण्यात आले आहे.

कार्यशाळेचा उद्देश सरकारी लेखा प्रणालीचे बळकटीकरण, डेटाची अचूकता सुनिश्चित करणे तसेच राज्य सरकारी कर्मचाऱ्यांची साक्षरता वाढविणे हा आहे.

# कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम २०१३; जिल्ह्यातील ३७४ शासकीय व खासगी कार्यालयांची तपासणी

छत्रपती संभाजीनगर दि.१३ (प्रतिनिधी)- कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळास प्रतिबंध करण्यासाठी लागू असलेल्या ‘कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम, २०१३’ अर्थात **PoSH Act** ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्ह्यातील १५४ शासकीय व २२० खाजगी अशा ३७४ कार्याल यांची तपासणी करण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कोमल कोरे यांनी दिली आहे.

जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्यातील शासकीय व खासगी कार्यालये, संस्था, कंपन्या तसेच त्यांच्या शाखांमध्ये PoSH Act-2013 मधील तरतुदींची पूर्तता केली आहे किंवा नाही, यासाठी महिला व बाल विकास विभागामार्फत जून २०२६ पासून तपासणी मोहीम सुरू करण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार ही तपासणी करण्यात येत आहे. नोटीस बजावलेल्या कार्यालयांनी विहित मुदतीत आवश्यक पूर्तता न केल्यास अधिनियमातील तरतुदीनुसार ५० हजार रुपयांपर्यंत दंड आकारण्याची कारवाई संबंधित जिल्हाधिकारी व जिल्हा महिला व बाल विकास यंत्रणेमार्फत करण्यात येणार आहे.

ही कारवाई राज्यातील शासकीय व खासगी कार्यालयांवर करण्यात येत आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात आतापर्यंत १५४ शासकीय आणि २२० खासगी कंपन्या व कार्यालयांची तपासणी करण्यात आली आहे. यापैकी नियमांची पूर्तता न करणाऱ्या कार्यालयांना जिल्हास्तरावरून कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. जिल्ह्यातील सर्व शासकीय व खासगी कार्यालये, संस्था, कंपन्या आणि त्यांच्या शाखांनी PoSH Act-२०१३ मधील तरतुदींचे पालन करणे बंधनकारक आहे. तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार संबंधित कार्यालयांची माहिती केंद्र शासनाच्या SHe-Box Portal वर नोंदविणे, अंतर्गत तक्रार समितीची स्थापना व नोंदणी करणे, समिती सदस्यांचे प्रशिक्षण घेणे, कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे आणि वार्षिक अहवाल अद्ययावत करणे आवश्यक आहे. SHe-Box हे कामाच्या ठिकाणी लैंगिक छळाच्या तक्रारींसाठी केंद्र शासनाचे ऑनलाइन व्यासपीठ असून, त्यावर कार्यालये व अंतर्गत समित्यांची माहिती अद्ययावत करण्यावर भर देण्यात आला आहे.

तपासणी दरम्यान संबंधित कार्याल यांनी आवश्यक पूर्तता केली नसल्याचे आढळून आल्यास त्यांच्यावर अधिनियमातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाने PoSH Actच्या अंमलबजावणीसाठी कार्यालये व आस्थापनांची तपासणी करण्याची प्रक्रिया सुरू केली असून, त्यामध्ये अंतर्गत तक्रार समितीची स्थापना आणि SHe-Box वरील नोंदणीसह विविध अनुपालन बाबी तपासल्या जात आहेत,असे जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कोमल कोरे यांनी कळविले आहे.

# नारेगावातून १ किलो ५६ ग्राम गांजा जप्त, एका आरोपीवर गुन्हा दाखल

छत्रपती संभाजीनगर दि.१३ (प्रतिनिधी)- अमली पदार्थ प्रतिबंधक विभागाच्या पथकाने नारेगाव परिसरात कारवाई करत विक्रीसाठी आणलेला १ किलो ५६ ग्रॅम वजनाचा गांजा जप्त केला. या कारवाईत एका संशयितास ताब्यात घेण्यात आले असून, त्याच्याविरुद्ध एमआयडीसी सिडको पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अमली पदार्थ प्रतिबंधक विभागाचे सहायक पोलीस निरीक्षक सचिन जाधव, पोल ीस उपनिरीक्षक उमेश्वर मुंडे व पथकातील अंमलदारांनी वरिष्ठांच्या आदेशानुसार मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे ही कारवाई केली. नारेगाव येथील एमआयडीसी सिडको परिसरात इसम नामे चरणसिंग मदनसिंग मलके (वय ५०) हा महादेव मंदिराच्या पाठीमागे गांजाची चोरीछुपी विक्री करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती.

त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून कारवाई केली. या कारवाईत १ किलो ५६ ग्रॅम गांजा, एक मोबाईल हॅंडसेट, इलेक्ट्रॉनिक वजनकाटा आणि रोख रक्कम, असा एकूण ६७ हजार २२१ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी एमआयडीसी सिडको पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त प्रवीण पवार, पोलीस उपायुक्त (गुन्हे) शशिकांत सातव, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) मजहर सय्यद व पोलीस निरीक्षक गजानन कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पथकात सहायक पोलीस निरीक्षक सचिन जाधव, पोउपनि उत्रेश्वर मुंडे, पोहेकॉ/अंमलदार भाउसिंग चव्हाण, पोहेकॉ नारायण पायघन, पोअं/सतीश जाधव, मपोअं/छाया लांडगे, पोअं देशराज मोरे, पोअं सरताज पठाण, पोअं विशाल मेटे तसेच चालक पोअं विठ्ठल पवार यांचा समावेश होता.


दैनिक लोकविजय **CHANGE OF NAME**

I HAVE CHANGED MY NAME FROM
**OLD NAME** - SADAF AAFREEN SHAIKH NAYEEMUDDIN
**NEW NAME** - SADAF AFRIN FAHEEM KHAN
**Address-** H NO 6-12-840 RAHUL NAGAR NEAR MOHSIN KIRANA RAILWAY STATION AURANGABAD 431001
MOB 9762714470



महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**निविदा सूचना**

कार्यकारी अभियंता शहर विभाग क्र.१, छत्रपती संभाजीनगर यांचेकडून टी.सी. फ्यूज वायर (१२ SWG व १४ SWG) चा पुरवठा कामासाठी निविदा क्र. १५ व १६ क्रमांकाद्वारे दि.१४.०८.२०२६ ते २३.०८.२०२६ पर्यत मागविण्यात येत आहे.कामासबंधीचा सविस्तर तपशील **https://etender.mahadiscom.in/eatApp/latestTendersWorks** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**पीआरओ क्र.११३/२०२६**

**कार्यकारी अभियंता, शहर विभाग क्र.१, छत्रपती संभाजीनगर**


## छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

जा.क्र.छत्रपती संभाजीनगर/मनपा/प्र.नि./२१८/२०२६ दिनांक : १३/०८/२०२६

### जाहीर सूचना

पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) अधिनियम, २०१४ व महाराष्ट्र पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) नियम, २०१६ अन्वये छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका क्षेत्रातील शहर पथविक्रेता समिती गठित करण्यात येत आहे. महाराष्ट्र पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) नियम, २०१६ मधील प्रकरण चार मधील कलम ११ व १२ नुसार ११(२), नियम २२ (ख) इतर मंडळातील (दोन) ते पाच या प्रवर्गातील सदस्यांचे नामनिर्देशन करण्यासाठी खालील संस्थे / संघ यांचेकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| इतर मंडळ प्रवर्ग | सदस्य संख्या |
|---|---|
| अशासकीय संस्था / समुदाय आधारित संस्था | २ |
| निवासी कल्याण संघ | २ |
| व्यापारी संघाचा प्रतिनिधी | १ |
| पणन संघाचा प्रतिनिधी | १ |

**नगर पथविक्रेता समितीच्या नामनिर्देशन सदस्यांसाठी किमान अर्हता :**

१. अर्जदार वय २५ वर्षांपेक्षा कमी नसावे.
२. अर्जदार हा छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका क्षेत्राचा रहिवासी असावा.
३. अर्जदारास न्यायालयाने कोणत्याही गंभीर गुन्ह्यात शिक्षा ठोठावलेली नसावी. याबाबत प्रतिज्ञापत्र सादर करावे.
४. संघटना किंवा संघाची संबंधित क्षेत्रातील सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणी झालेली असावी.
५. संघटना किंवा संघ यांनी मागील तीन वर्षे सक्षम प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेला लेखापरीक्षण अहवाल सादर करावेत.
६. संघटना किंवा संघ यांना स्थानिक प्राधिकरणाकडून काळ्या यादीत टाकलेले नसावे. या बाबत प्रतिज्ञापत्र सादर करावे.
७. संघटना किंवा संघ त्या-त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये सिद्धदोषी असणार नाहीत.
८. संघटना किंवा संघ यांनी त्यांनी सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणी केलेल्या त्या कार्यक्रमातील कामाचा किमान पाच वर्षांचा अनुभव असावा.

उपरोक्त अर्हता धारण करीत असलेल्या इच्छुक संघटना किंवा संघ यांचेकडून नगर पथविक्रेता समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनासाठी आवश्यक त्या संबंधित कागदपत्रांसह कार्यालयीन वेळेत अर्ज सादर करावेत.

उपरोक्त संघटना किंवा संघ यांचेकडून निवड करावयाच्या सदस्य संख्येपेक्षा अधिक अर्ज प्राप्त झाल्यास नमूद नियमानुसार सदस्य नियुक्ती करण्यात येईल. सदरील जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते दि. २८/०८/२०२६ पर्यंत (शनिवार व रविवार वगळता) कार्यालयीन वेळेत विहित नमुन्यात अर्ज सादर करावेत. कार्यालयीन वेळेनंतर आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

(टीप-सदर इच्छुक संस्था / संघ यांचेकरीता छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या https://chhsambhajinagarmc.org/ या वेबसाईटवर विहित नमुन्यात अर्ज उपलब्ध आहेत.)

**स्वाक्षरीत/-**
**(अमोल येडगे) भा.प्र.से.**
**आयुक्त,**
**छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका,**

**अर्ज सादर करण्याचा पत्ता :** प्रकल्प विभाग, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका मुख्यालय.

**महाराष्ट्र शासन**

## नगर विकास विभाग

**४ था मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.**

**सूचना**

**दिनांक : २०.०५.२०२६**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६**

**क्र. टिपीएस-३०२५/९६८/प्र.क्र.१७२/२०२५/नवि-३० :-** ज्याअर्थी, छत्रपती संभाजीनगर मूळ हद्द (दुसरी सुधारित) + वाढीव हद्द (पहिली सुधारित) + सातारा, देवळाई +सिडको सिडको निर्धीसुचित क्षेत्र + चिकलठाणा MIDC, जि. छत्रपती संभाजीनगर क्षेत्राची विकास योजना (यापुढे ’उक्त विकास योजना’ असे संबोधिले आहे) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम ३७ वा) (यापुढे ’उक्त अधिनियम’ असे संबोधिले आहे) चे कलम ३१ चे उप कलम (१) अन्वये शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्र.टिपीएस-३०२५/प्र.क्र.६/२०२५/भागशः मंजूरी/नवि-३०, दि.१५.०४.२०२५ अन्वये भागशः मंजूर केली आहे (यापुढे ’उक्त विकास योजना’ असे संबोधिले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेमध्ये, मौजे वानखेडेनगर येथील न.भू.क्र. ११५०० (पै.) (यापुढे ’उक्त जमिन’ असे संबोधिले आहे) या जागेवर ’आरक्षण क्र. IV/57-PG’ प्रस्तावित आहे (यापुढे ’उक्त विकास योजना प्रस्ताव’ असे संबोधिले आहे):

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेतील उक्त जमिनीवरील ’आरक्षण क्र.1V/57-PG’ या आरक्षणाखालील जागेवर दि.०९.०५.२०२२ रोजी दिलेल्या बांधकाम परवानगीखालील क्षेत्र, आरक्षणातून वगळून मुक्त होणारे क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करणे (यापुढे ’उक्त फेरबदल’ असे संबोधले आहे) आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे;

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३७(१) (क क) (क) अन्वये प्राप्त अधिकारात आणि तदनुषंगिक शक्तींचा वापर करून, उक्त फेरबदलावर जनतेकडून सूचना / हरकती मागविण्यासाठी शासन ही सूचना प्रसिद्ध करीत आहे. उक्त फेरबदलावरील कोणत्याही सूचना / हरकती, ही सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत, विभागीय सहसंचालक, नगर रचना, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे दाखल करता येतील. विभागीय सहसंचालक, नगर रचना, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांना, प्राप्त सूचना / हरकतींवर सुनावणी देऊन आणि आवश्यकतेनुसार संबंधित नियोजन प्राधिकरणाचे म्हणणे घेऊन, त्यावरील अहवाल शासनास सादर करण्यासाठी प्राधिकृत करण्यात येत आहे;

विभागीय सहसंचालक, नगर रचना, छत्रपती संभाजीनगर विभाग, एम.बी.सी. टॉवर, दुसरा मजला, बाबा पेट्रोल पंपाजवळ, अदालत रोड, छत्रपती संभाजीनगर- ४३१ ००१, यांचेकडे, सदर सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या कालमर्यादेत उक्त फेरबदलाच्या अनुषंगाने प्राप्त होणाऱ्या हरकती / सूचना स्वीकारून विचारात घेण्यात येतील.

उक्त फेरबदल दर्शविणारी प्रस्तुत सूचना / भाग नकाशा जनतेच्या अवलोकनार्थ खालील कार्यालयात कामकाजाच्या दिवशी उपलब्ध राहील.

१. आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर.
२. विभागीय सहसंचालक नगर रचना, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर.
३. सहायक संचालक नगर रचना, छत्रपती संभाजीनगर शाखा, छत्रपती संभाजीनगर.

सदरची सूचना महाराष्ट्र शासनाचे www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशाने व नावाने,**

**स्वाक्षरीत/-**
**(प्रसाद रा. शिंदे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**Government of Maharashtra**
**Urban Development Department**
**4th Floor Main Building, Mantralaya,**
**Madam Kama Marg, Hutatma Rajguru Chowk,**
**Mumbai - 400 032**

## NOTICE

**Date : 20.05.2026**

The Maharashtra Regional & Town Planning Act, 1966

No.TPS-3025/968/CR-172/2025/UD-30:- Whereas, the Government in Urban Development Department vide its Notification No.TPS-3025/CR-06/2025/Part-Sanction/UD-30, dated the 15.04.2025 has partly sanctioned the Development Plan of Chhatrapati Sambhajinagar, Original Boundary (Second Revised) + Extended Limit (First Revised) + Satara Deolai + CIDCO / CIDCO Denotified Area + Chikalthana MIDC, Dist. Chhatrapati Sambhajinagar (hereinafter referred to as "the said Development Plan") under section 31(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maharashtra Act No. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act");

And whereas, in the said Development Plan, the land bearing CTS No.11500 (Pt.) of Village Wankhedenagar (hereinafter referred to as "the said Land") is reserved as "Site No. IV/57-PG" (hereinafter referred to as "the said Development Plan Proposal");

And whereas, the Government is of opinion that, it is necessary to exclude the area under the building permission granted on dated the 09.05.2022 under the said Land from "Site No.IV/57-PG" and to include the land so released in Residential Zone (hereinafter referred to as "the said Modification");

Now therefore, in exercise of the powers conferred under section 37(1AA) (A) of the said Act and all other powers enabling in that behalf, the Government hereby publishes this Notice for inviting Suggestion / Objection from the general public in respect of the said Modification. Any objections/suggestions upon the said Modification, shall be forwarded, before the expiry of one month from the date of publication of this Notice in Official Gazette to the Divisional Joint Director of Town Planning, Chhatrapati Sambhajinagar Division who is hereby authorized as an Officer to hear objections/suggestions and say of concerned Planning Authority, as applicable, and submit his report to the Government;

Only the suggestions and / or objections regarding the said Modification, that may be received by the Divisional Joint Director of Town Planning, Chhatrapati Sambhajinagar Division, having his office at M.B.C. Tower, Second Floor, Near Baba Petrol Pump, Adalat Road, Chhatrapati Sambhajinagar-431001, within the stipulated period of one month from the date of publication of this Notice in the Official Gazette, shall be considered.

Copy of the said Notice along with the plan showing the said Modification shall be made available for inspection to general public at the following offices during office hours on all working days.

1) The Commissioner, Chhatrapati Sambhajinagar Municipal Corporation, Chhatrapati Sambhajinagar.
2) The Divisional Joint Director of Town Planning, Chhatrapati Sambhajinagar Division, Chhatrapati Sambhajinagar.
3) The Assistant Director of Town Planning, Chhatrapati Sambhajinagar Branch, Chhatrapati Sambhajinagar.

This Notice shall also be made available on the Government website www.maharashtra.gov.in

**By order and in the name of the Governor of Maharashtra,**

**Sd/-**
**(Prasad R. Shinde)**
**Under Secretary to Government**

विमाका/छत्रपती संभाजीनगर/जाहि./९२/२०२६